POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१९५ ● मुंबई, सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## भंडाऱ्यात नवजात बालिकेची अडीच लाखांत विक्री

### डॉक्टर बालविक्री रॅकेटचा सूत्रधार?

**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

भंडारा जिल्ह्यात नवजात बालिकेच्या विक्रीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने दहा दिवसांच्या चिमुकलीला उपचारासाठी नागपूरला पाठवत असल्याचे सांगून तिची तब्बल अडीच लाख रुपयांत विक्री करण्यात आल्याचा आरोप आहे. या संपूर्ण रॅकेटचा सूत्रधार गोंदिया येथील एक नामांकित डॉक्टर असल्याची माहिती समोर आली असून त्याच्यासह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात असून मुख्य आरोपी डॉक्टर मात्र फरार आहे.

चित्रपटात पाहायला मिळणारा मुलांच्या विक्रीचा प्रकार आता थेट भंडारा जिल्ह्यात उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली आहे. पांढराबोडी येथील मालती प्रकाश वाघमारे हिच्या घरी दहा दिवसांची नवजात बालिका असल्याची माहिती २ फेब्रुवारी रोजी महिला व बालकल्याण विभागाच्या चाइल्ड हेल्पलाइन १०९८ वर अज्ञात व्यक्तीने दिली. माहिती मिळताच जिल्हा समन्वयक आणि कर्मचाऱ्यांचे पथक वाघमारे यांच्या घरी पोहोचले. तेथे नवजात बालिका

या प्रकरणात पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे. त्यात एका महिलेला देखील अटक करण्यात आली आहे. तर या विषयी पोलिसांनी सद्या बोलण्यास नकार दिला असून या मागे आणखी किती मोठा रॅकेट आहे. याचा खुलासा झाल्यावर सांगितल्या जाईल असं पोलिस अधीक्षक याचं म्हणणं आहे. विशेष म्हणजे या रॅकेटचा मुख्य सूत्रधार असलेला गोंदिया येथील नामांकित डॉक्टर सध्या फरार आहे.. डॉक्टर अटकेत आल्यानंतर हा प्रकार एका बालिकेपुरताच मर्यादित आहे की यामागे आणखी मोठे रॅकेट कार्यरत आहे, याचा उलगडा होण्याची शक्यता आहे. सध्या या घटनेमुळे जिल्ह्यात संताप व्यक्त होत असून नवजात बालिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.




आढळून आली. ही मुलगी गोंदिया येथून आणल्याचे मालतीने सांगितले. अधिक चौकशीसाठी ३ फेब्रुवारी रोजी तिला भंडारा येथील महिला व बालकल्याण कार्यालयात बोलावण्यात आले होते. मात्र ती उपस्थित राहिली नाही.

यानंतर चाइल्ड हेल्पलाइनच्या समन्वयकांनी संपूर्ण माहिती पोलिसांना दिली. वरठी पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ पांढराबोडी येथे दाखल झाले. मात्र तोपर्यंत संबंधित महिला बालिकेला घेऊन चारचाकी वाहनातून पसार झाली होती. पोलिसांनी नाकाबंदी करून कुशारी फाटा येथे संशयित वाहन अडवले. वाहनात महिला आणि दहा दिवसांची चिमुकली आढळून आली. बालिकेच्या अधिकृत माता-पित्यांबाबत किंवा आवश्यक कागदपत्रांबाबत समाधानकारक माहिती देण्यात ती अपयशी ठरली. गोंदिया येथील एका डॉक्टरांच्या सांगण्यावरून मुलीला गोंदियाला घेऊन जात असल्याचे तिने कबूल केले. तपासात पुढे धक्कादायक बाब समोर आली. संबंधित दाम्पत्याला मुलगी अशक्त असल्याचे सांगून उपचारासाठी नागपूरला पाठवण्याचा सल्ला देण्यात आला होता. मात्र त्याच वेळी गोंदिया येथील टोळीने या नवजात बालिकेची अडीच लाख रुपयांत विक्री केल्याचे उघड झाले.

## पोलिसांचं मोठं ऑपरेशन!

### स्पा सेंटरच्या आडून वेश्या व्यवसाय...

### ५८ गुन्हे, ९३ दलाल अटकेत... २०७ महिलांची सुटका

**■पुणे। प्रतिनिधी,**

गेल्या काही वर्षांमध्ये भारतात मसाज सेंटर म्हणजेच स्पा सेंटरचे प्रमाण वाढले आहेत. पण या स्पा सेंटरच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे धक्कादायक बाब समोर आली आहे. गेल्या वर्षभरात पोलिसांनी वेश्या व्यवसायला आळा घालण्यासाठी मोठं ऑपरेशन हाती घेतलं होतं. ज्यात त्यांनी स्पा चालकसह मॅनजेरसह ९३ दलालांना गजाआड केलं आहे. गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व प्रतिबंधक कक्ष आणि स्थानिक पोलीस ठाण्यांच्या पथकांनी ही मोठी कारवाई करत मोठा पर्दाफाश केला आहे.

या स्पा सेंटरच्या छापेमारीतून पुणे पोलिसांनी जवळपास २०७ महिलांपैकी ३८ विदेशी तरुणींची सुटका केली आहे.




पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या धडक कारवाईमुळे वेश्या व्यवसायाला मोठा धक्का बसला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार स्पा सेंटरमध्ये काम करण्यासाठी विदेशी तरुणी पर्यटनसह अन्य व्हिसावर भारतात प्रवेश करतात. त्यानंतर त्या शहरातील वेगवेगळ्या स्पा सेंटरमध्ये मसाज थेरपिस्ट म्हणून कामाला लागतात. खरंतर पर्यटन व्हिसावर भारतात नोकरी करता येत नाही. त्यामुळे या तरुणींनी नियमांचं उल्लंघन केल्याच स्पष्ट होतं.

पोलिसांनी सांगितलं की, अशा स्थितीत या विदेशी तरुणींना सर्वप्रथम भारत सोडून जाण्याची नोटीस दिली जाते. मग त्याचा पाठपुरावा करण्यात येतो. जर त्या नोटीस दिल्यानंतरही भारतात आढळल्यास त्यांनी सक्तीने भारताबाहेर पाठवले जाते. पोलिसांनी सांगितलं की, 1 जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या दोन महिन्यांच्या काळात पोलिसांनी 58 गुन्ह्यांची नोंद केली आहे. पोलीस ठाण्यांकडून ४४ गुन्हे तर गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने १४ गुन्हे दाखल झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तर या स्पामधील वेश्या व्यवसायात अडकलेल्या २०७ पीडित महिलांची सुटका पोलिसांनी केली असून यामध्ये ३८ विदेशी महिला तर १६९ भारतीय महिलांचा समावेश आहे. धक्कादायक म्हणजे यात तीन अल्पवयीन मुलींचाही समावेश आहे.

## जीव वाचवण्यासाठी तरुणाचा आमदारांच्या बंगल्यात प्रवेश



**■उरण। प्रतिनिधी,**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या बंगल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा सोशल मीडिया आणि वृत्तवाहिन्यांवर वाऱ्यासारखी पसरली होती. मात्र पोलिसांच्या तपासानंतर या घटनेमागील सत्य समोर आले असून, आमदारांच्या घरावर कोणताही हल्ला झाला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उरण शहरातील एक तरुण आपल्या मित्रांसोबत पार्टी करत असताना किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर मारामारीत झाल्यानंतर परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे पाहून संबंधित तरुणाने तेथून पळ काढला. घाबरलेल्या अवस्थेत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी तो थेट आमदार महेश बालदी यांच्या बंगल्यात शिरला. दरम्यान, 'आमदारांच्या बंगल्यावर हल्ला' अशा आशयाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र उरण पोलीस ठाणे यांनी तपास केल्यानंतर संबंधित तरुणाने केवळ संरक्षणासाठी तेथे आश्रय घेतल्याचे निष्पन्न झाले.

## अल्पवयीन मुलाचे अपहरण करून वारंवार लैंगिक अत्याचार, १९ वर्षांच्या तरुणीवर पोक्सो अंतर्गत गुन्हा

**आरोपी फरार, शोधमोहिम सुरू**

'पीडित मुलाच्या जबाबाच्या आधारे, आम्ही १९ वर्षीय मुलीविरुद्ध लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याच्या संबंधित कलमांखाली आणि भारतीय न्याय संहिता अंतर्गत अपहरणाच्या आरोपाखाली एफआयआर नोंदवला आहे,'' असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. गुन्हा दाखल झाला असला तरी, पोलिसांनी अद्याप आरोपी तरुणीला अटक केलेली नाही. आरोपी सध्या फरार आहे आणि तिचा ठावठिकाणा शोधण्यासाठी शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.




**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईच्या मानखुर्द परिसरातून धक्कादायक घटना समोर आली आहे. मानखुर्द पोलिसांनी एका १९ वर्षीय मुलीविरुद्ध 'एकतर्फी प्रेमा'तून १७ वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण करून वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपी तरुणीने अल्पवयीन मुलावर शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दबाव आणला आणि नंतर लग्नाचा प्रस्ताव नाकारल्यानंतर त्याचे अपहरण केले, असा आरोप आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगा मानखुर्द परिसरात राहतो आणि आरोपी सानिया (१९) देखील त्याच परिसरातील रहिवासी आहे. सानिया पीडित मुलाला ओळखत होती आणि तिचे त्याच्यावर एकतर्फी प्रेम होते.

**गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यापासून अत्याचार**

गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यापासून पीडित मुलावर अत्याचार सुरू झाले. पहिले आरोपी तरुणीने मुलाला फुस लावून तिच्या घरी नेले आणि त्याच्यावर शारीरिक संबंध ठेवण्यास दबाव आणला. जर याबाबत कोणाला काही सांगितले तर त्याचे गंभीर परिणाम होतील अशी धमकीही तिने दिली होती, असे पीडित मुलाने पोलिसांना सांगितले.

**लग्नास नकार दिल्यामुळे अपहरण**

आरोपी तरुणीने ऑगस्ट २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत वारंवार मुलाचा छळ केला. लग्न करण्यासाठी सतत मुलावर दबाव आणत होती. मुलाने लग्नास नकार दिल्यावर तिने स्वतःचं बरं-वाईट करण्याची धमकी दिली आणि अखेर त्याचे अपहरण केले. मुलाने तिच्या तावडीतून स्वतःची कशीबशी सुटका करून घेतल्यानंतर आणि संपूर्ण घटना त्याच्या कुटुंबातील सदस्यांना सांगितल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले आहे. कुटुंबाने तात्काळ मानखुर्द पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## मोठ्या कंपन्यांचे कार्यक्रम सांगून १७.५१ लाख उकळले

### छत्रपती संभाजीनगरातील धक्कादायक प्रकार

**■संभाजीनगर। प्रतिनिधी,**

छत्रपती संभाजीनगरमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली मोठी फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. जलद नफा मिळेल आणि व्यवसायात भागीदार होता येईल, अशा गोड बोलण्याला भुलून एका तरुणाने आपली बचत आरोपींकडे दिली.

सुरुवातीला सर्व काही विश्वासार्ह वाटत असल्याने त्याने वेळोवेळी रक्कम दिली, मात्र काही महिन्यांनी व्यवहारात संशय निर्माण झाला. पैसे परत मागितल्यावर टाळाटाळ सुरू झाली आणि अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने पोलिसांकडे धाव घेतली. या घटनेमुळे गुंतवणूक करताना काळजी घेण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

**घटना कशी उघडकीस आली**

एन-९ सिडको परिसरात राहणाऱ्या फिर्यादी तरुणाची ओळख आरोपी संजना देविदास चौधरी हिच्याशी तिच्या भावामार्फत झाली होती. संजना चौधरी आणि तिचा भाऊ सुयश देविदास चौधरी यांनी आपण इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्रात काम करत असल्याचे सांगितले. मोठ्या कंपन्यांचे कार्यक्रम आपल्या मार्फत आयोजित केले जातात आणि व्यवसाय विस्तारासाठी गुंतवणूकदारांची गरज आहे, असे त्यांनी सांगून तरुणाचा विश्वास जिंकला.




**नागरिकांसाठी सतर्कतेचा इशारा**

अलीकडच्या काळात जलद नफ्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढताना दिसत आहेत. अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवून मोठी रक्कम देण्यापूर्वी कागदपत्रांची खातरजमा करणे आवश्यक आहे. अधिकृत नोंदणी, करारपत्र आणि व्यवहाराची लेखी नोंद नसल्यास गुंतवणूक टाळावी, असा सल्ला पोलिसांकडून देण्यात येत आहे. ही घटना इतरांसाठी सावधानतेचा इशारा ठरत आहे.

**गुंतवणुकीच्या नावाखाली रक्कम उकळली**

आरोपींनी सुरुवातीला कमी रकमेची मागणी करून व्यवहार सुरू केला. नंतर नफ्याचे आश्वासन देत टप्प्याटप्प्याने अधिक पैसे घेण्यात आले. बनावट कागदपत्रे आणि कामाचे फोटो दाखवून व्यवहार खरे असल्याचे भासवण्यात आले. अशा प्रकारे आरोपी बहीण-भावाने मिळून एकूण १७ लाख ५१ हजार रुपये घेतले. काही काळानंतर अपेक्षित परतावा मिळाला नाही, तसेच संपर्क टाळण्यास सुरुवात झाल्याने फिर्यादीला संशय आला.

**पोलिसांत गुन्हा दाखल**

पैसे परत मिळत नसल्याचे लक्षात येताच तरुणाने सिडको पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनुसार संजना देविदास चौधरी आणि सुयश देविदास चौधरी यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी प्राथमिक चौकशी सुरू केली असून व्यवहाराशी संबंधित कागदपत्रांची तपासणी केली जात आहे.

## मॅट्रोमोनियल वेबसाईटवर मुलीनं लग्न केलं, नवरा निघाला ४ मुलांचा बाप

मुंबईतील अंधेरीत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. एका ३३ वर्षीय महिला मॅट्रोमोनियल वेबसाईटवर फसवणुकीला बळी पडली आहे. चार मुलांचा बाप आपण अविवाहित असल्याचे सांगून त्याने संबंधित तरुणीशी विवाह केला. नंतर तो पुरुष हा चार मुलींचा बाप असल्याचे उघड झाले. पीडितेनं फसवलेल्या शब्बीर शेख उर्फ समीर आणि त्याचा भाऊ शाकीर शेख यांच्याविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल केला. दोन्ही आरोपी सध्या फरार असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला अंधेरीत एका रुग्णालयात रिसेप्शनिस्ट म्हणून कार्यरत असल्याची माहिती आहे. २०२४ मध्ये घटस्फोटानंतर, तिने पुनर्विवाह करण्यासाठी एका मेट्रिमोनियल वेबसाइटवर प्रोफाइल तयार केले. आरोपीने तिच्याशी संपर्क साधला असता, त्याने आपण स्वतः बिझनेसमन असल्याचा दावा केला, तसेच त्याची पत्नी आणि आई वडिलांचे निधन झाले. दरम्यान डिसेंबर २०२४ मध्ये दोघेही जोगेश्वरी येथे एका लग्नात भेटले होते.

**जोडप्याने जय जयवंती सोसायटीत केला विवाह**

एफआरआयनुसार, जोडप्याने ३० सप्टेंबर २०२५ रोजी कुर्ला (पूर्व) येथील जय जयवंती सोसायटीत विवाह केला होता. या लग्नसमारंभात आरोपीचा भाऊ आणि मेहुणी त्या ठिकाणी उपस्थित होते. लग्नाच्या काहीच दिवसांत त्याने आपले आई वडील जिवंत आहेत आणि त्यांना हा विवाह मान्य नाही, असं सांगितलं.

**आरोपीला पहिल्या बायकोपासून चार मुलं**

नंतर जेव्हा महिलेला जोगेश्वरी येथील तिच्या सासरच्या घरी नेलं तेव्हा आढळून आलं की, आरोपी हा आधीच विवाहित होता आणि त्याला त्याच्या पहिल्या बायकोपासून चार मुलं देखील आहेत. पीडितेनं सांगितलं की, संबंधित आरोपीने नकळत मोबाईलचा पासवर्ड मिळवून काही कजार्शी संबंधित ॲप डाऊनलोड करून १.७७ लाखांचे तिच्या नावावर कर्ज काढण्यात आलं. नंतर संबंधित रक्कम आरोपीने भावाच्या खात्यात पाठवली. तसेच व्यवसायात तोटा झाल्याचे कारण सांगत त्याने १.४५ लाख रुपये ही रक्कम देखील घेतली.

अशातच आरोपी पती आणि त्याचा भाऊ हा तिथून गायब झाला, त्यांनी कपाटातून ४३ ग्रॅम सोन्याचे दागिने गायब केले, त्याची किंमत आता ६ लाखांहून अधिक होती.

## राज्यात एटीएसची मोठी कारवाई! एकाचवेळी २१ ठिकाणी छापेमारी



**■मुंबई । प्रतिनिधी,**

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई केली आहे. १५ फेब्रुवारी रोजी राज्यात मोठ्या प्रमाणात शोध मोहीम राबवली. यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यात ही कारवाई करण्यात आली, जिथे एकूण २१ ठिकाणी छापे टाकण्यात आले. अळर च्या पथकांनी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद आणि उमराखेड शहरातील १७ ठिकाणी तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील सात ठिकाणी शोध मोहिम राबवली. ही कारवाई मध्यरात्रीच्या सुमारास सुरू झाली आणि सकाळपर्यंत सुरू राहिली. तरुणांमध्ये कट्टरतावाद आणि दहशतवादी कारवायांचा संशय असलेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली.

एटीएस पथकांनी संशयितांच्या घरांवर, कार्यालयांवर आणि इतर ठिकाणी धाड टाकली. सर्वांची झडती घेण्यात आली. छाप्यांमध्ये गुन्हेगारी कागदपत्रे, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज देखील तपासण्यात आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छाप्यांमध्ये दहशतवादी संघटनांशी संबंध किंवा तरुणांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नांशी संबंधित साहित्य आढळले. अद्याप कोणालाही औपचारिकरित्या अटक करण्यात आलेली नसली तरी, एक डझनहून अधिक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील कट्टरतावाद आणि दहशतवादविरोधी कारवायांवर लक्ष ठेवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. एटीएसने जिल्हा पोलिस पथकांच्या सहकार्याने काम केले आणि मोठ्या संख्येने पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले. राज्यात अनेक तरुणांमध्ये कट्टरतावाद निर्माण होत आहे. या माहितीच्या आधारे हे छापे टाकण्यात आले. गेल्या काही महिन्यांत, महाराष्ट्र एटीएसने अल कायदा आणि इतर संघटनांशी संबंधित अनेक प्रकरणांमध्ये कारवाई केली आहे, ज्यामुळे सुरक्षा एजन्सी हाय अलर्टवर आहेत. यापूर्वी विविध जिल्ह्यांमध्ये अशाच प्रकारच्या कारवाया करण्यात आल्या असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. कोणतीही संशयास्पद हालचाल खपवून घेतली जाणार नाही आणि राज्यात शांतता राखण्यासाठी कडक उपाययोजना केल्या जात आहेत. ही घटना महाशिवरात्रीच्या दिवशी घडली, ज्या दिवशी देशभरात धार्मिक कार्यक्रम होत होते, परंतु सुरक्षा दलांनी या कारवाईबाबत अधिक सतर्कता बाळगली.

## ई-केवायसी मुदत वाढली, पण सर्वांसाठी नाही... फक्त 'या' महिलांनाच मिळणार संधी, संकेतस्थळावर दिला स्पष्ट संदेश

**नव्या नोंदणीसाठी संधी नाही**

मात्र, संकेतस्थळावर आता स्पष्ट संदेश झळकत आहे की, ही सुविधा केवळ ई-केवायसी करताना चुकीची निवड झालेल्या लाभार्थ्यांसाठी आहे. नव्याने ई-केवायसी नोंदणी करण्यासाठी ही मुदत लागू नसल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी आपली पात्रता आणि पूर्वीची नोंद तपासूनच पुढील प्रक्रिया करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**■भंडारा। प्रतिनिधी,**

राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेबाबत ई-केवायसी संदर्भात महत्त्वाची स्पष्टता समोर आली आहे. ३१ मार्चपर्यंत मुदत वाढवण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर अनेक महिला नव्याने ई-केवायसी करता येईल, या अपेक्षेने संकेतस्थळावर लॉगिन करत आहेत. मात्र, ही मुदत सर्वांसाठी नसल्याचे पोर्टलवरील सूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. लाभ योग्य व्यक्तींपर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहोचावा, यासाठी ई-केवायसी सक्तीची करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष प्रक्रियेदरम्यान अनेक महिलांना तांत्रिक




अडचणींचा सामना करावा लागला. मोबाईल वा इंटरनेट सुविधा नसणे, आधार-बँक खाते लिंक नसणे, ओटीपी न मिळणे, तसेच ऑनलाइन फॉर्ममधील तांत्रिक बाबी न समजल्याने अनेक अर्ज अपूर्ण राहिले.

काही ठिकाणी सायबर कॅफे किंवा मध्यस्थांच्या मदतीने प्रक्रिया पूर्ण करण्यात आली; मात्र चुकीची माहिती भरली जाणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड न होणे किंवा उत्पन्न निकषांमुळे काही लाभार्थी अपात्र ठरल्याच्या तक्रारी पुढे आल्या. विशेषतः ज्या महिलांनी ई-केवायसी करताना चुकीचा पर्याय निवडला, त्यांच्या नोंदी अडकल्या.

याच पार्श्वभूमीवर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यापूर्वी स्पष्ट केले होते की, ज्यांच्या ई-केवायसी प्रक्रियेत त्रुटी राहिल्या आहेत, अशा पात्र लाभार्थ्यांना माहिती दुरुस्तीसाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत संधी देण्यात येत आहे.

## पुरुषाने केले दोन लग्न, दुसऱ्या बायकोच्या मुलाचा एक लाख रुपयांत केला सौदा... वडील मुलाच्या नात्याला काळीमा

**■मुंबई । प्रतिनिधी,**

ओडिशातील बालासोर येथून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वडिलांनी मुलाला एक लाख रुपयांत विकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी जलद कारवाई करत मुलाला या प्रसंगातून सुखरूप बाहेर काढले, या प्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनं वडील आणि मुलाच्या नात्याला काळीमा फासली गेली आहे.

संबंधित प्रकरणात एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना बालासोर येथील नीलगिरी अधिसूचित क्षेत्र परिषदेतील बारीसाही गावात घडली. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओनंतर हे प्रकरण उघडकीस आले, ज्यात वडिलच आपल्या मुलाचा सौदा करताना दिसत आहेत.

दरम्यान, व्हिडिओ समोर आल्यानंतर एका स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी सांगितलं की, चिमिनीभाटी परिसरातून मुलाला ताब्यात घेण्यात आले आणि बाल कल्याण समिती सीडब्ल्यूसीकडे सोपवण्यात आले. त्यांनी सांगितलं की, या प्रकरणी सविस्तरपणे चौकशी सुरु आहे आणि दोन व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आणि बाल कल्याण समितीकडे सोपवण्यात आले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बेहाराचे दोनदा लग्न झाले आणि विकले गेलेले मूल त्याच्या दुसऱ्या पत्नीपासून जन्माला आले होते, आता ती त्याच्यापासून वेगळी राहते. पोलीस संपूर्ण तपास करत असून मानवी तस्करींच्या संभाव्य दृष्टीकोनातून देखील तपास करत आहेत.

**आरोपीच्या वडिलांची ओळख पटली**

या प्रकरणी दोन व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आणि त्यांची चौकशी सुरु आहे. दरम्यान पोलिसांना आरोपीला वडिलांची ओळख पटली आहे. तो व्यवसायाने गवंडी काम करतो. कराराचा भाग म्हणून त्याने 50 हजार रुपयांच्या हप्ता घेतल्याचा आरोप आहे. चौकशीदरम्यान त्याने आर्थिक अडचणींची काही कारणं सांगितली. त्याने सांगितले की त्याला चार मुले आहेत आणि त्याच्या कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी मोठी आर्थिक समस्या निर्माण होते.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# रुद्रावतार अधर्माच्या नाशासाठी!



'भक्तांवर त्वरित कृपा करणारी देवता', अशी या सांबशिवाची ख्याती त्रिभुवनात आहे. त्यामुळे संपूर्ण सृष्टीमध्ये भगवान शिवाची उपासना सर्वाधिक होते. देशाच्या कानाकोर्पयात आज महाशिवरात्रीनिमित्त शिवोपासना होईल. भारतभरातील भगवान शिवाच्या मंदिरांमध्ये शिवपिंडीवर जलाभिषेक आणि दुग्धाभिषेक होईल. मंदिराच्या बाहेर रांगेत घंटोन्घंटे उभे राहूनही कोट्यवधी हिंदु भाविक अत्यंत भक्तीभावाने आणि श्रद्धेने भगवान शिवाचे दर्शन घेतील. कोट्यवधी हिंदु बांधव उपवास करून भजन-कीर्तन आदी शिवोपासना करतील. सुवासिनीच्या अंगावरील अनेक अलंकारांमध्ये मंगळसूत्र जसे सौभाग्याचे प्रतीक म्हणून सर्वाधिक मूल्यवान, तसेच या विविध धार्मिक उपासना, म्हणजे हिंदु संस्कृतीचा सौभाग्यालंकारच आहे. धर्माच्या सचेतनेचे हे प्रतीक आहे. समाज वैज्ञानिकदृष्ट्या कितीही प्रगत झाला, आधुनिकतेचा कितीही अंगीकार केला, तरी त्या अचेतनाची चेतना अध्यात्मातच दाखवणारे हे सण-उत्सव आहेत आणि भारतभूमीचा तर आत्माच अध्यात्म हा आहे. जगात भारताची ओळख अन्य कशामुळे नव्हे, तर अध्यात्मामुळेच आहे. धार्मिक परंपरा, सण यांना विरोध करण्यासाठी पुरोगाम्यांनी 'शिवपिंडीवर दुग्धाभिषेक करू नका' आदी कितीही कोल्हेकुई केली, तरी ही ईशआराधना थांबणारी नाही. त्या त्या काळानुसार चांगल्यासह अनिष्ट गोष्टी समाजात असतातच. ज्याप्रमाणे असत्यामुळे सत्याचे महत्त्व टिकून रहाते, त्याचप्रमाणे वाईटामुळेच समाजात चांगल्या शक्तीचे श्रेष्ठत्व दृढ रहाते. त्यामुळे सत्य-असत्य, म्हणजे धर्म-अधर्माचा लढा युगानुयुगे चालू आहे. त्यामुळे सद्यःस्थितीतही हा संघर्ष अटळ आहे. सृष्टीचा पालनकर्ताच भगवंत असल्यामुळे धमार्चा विजय हा निश्चित आहेच; मात्र वेळ अशी येते की, जेव्हा अधर्म प्रबळ होतो, स्वतःला धर्माचे अनुयायी म्हणवणारे अधर्माच्या अधीन होतात, अधर्म बळावतो, अशा स्थितीतही जे धर्माच्या बाजूने, म्हणजेच ईश्वराच्या बाजूने ठाम रहातात, तेच त्याच्या कृपेला पात्र ठरतात. धर्मसंस्थापनाची वेळ प्रत्येक काळात येतच असते आणि याच संधीकालाची वेळ आता आली आहे. या काळात भगवान शिवाची उपासना महत्त्वाची आहे. पूर्वीचे आक्राळविक्राळ राक्षस यज्ञयागाला विरोध करायचे. आताच्या काळात सनातन संस्कृतीला नष्ट करण्यासाठी टपलेल्या या दुष्प्रवृत्तींची रूपे काळानुसार आधुनिक आहेत. अशा वेळी केवळ दुग्धाभिषेक आणि जलाभिषेक करून केवळ स्वहितासाठी प्रार्थना हा स्वार्थीपणा ठरेल. ३५० वर्षांपूर्वीचा काळ आठवा. ज्या वेळी हिंदु धर्माला नामशेष करायला म्लेंच्छ धर्मांधांच्या तलवारी उठल्या होत्या, तेव्हा छत्रपती शिवरायांनी शिवपिंडीवर रक्ताभिषेक करून हिंदु राष्ट्र स्थापन करण्याची प्रतिज्ञा केली होती. छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा मूठभर मावळ्यांसह रोहिडेश्वराच्या पिंडीपुढे घेतली होती. या प्रतिज्ञेचे स्वरूप, म्हणजे देहलीच्या तख्ताला हादरा देऊन झालेली हिंदवी स्वराज्याचीं नर्मिती होय! आजही हिंदु धमार्ला धर्मांध, साम्यवादी, पुरोगामी, कथित निधर्मी यांनी ग्रासले आहे. हिंदु धर्मावरील ही संकटे दूर करून हिंदु राष्ट्राची पुनर्स्थापना करण्याची प्रतिज्ञा करण्याचा महाशिवरात्री व्यतिरिक्त अन्य शुभसमय कोणता असावा! छत्रपती शिवरायांनी ज्याप्रमाणे शिवपिंडीपुढे हिंदु राष्ट्र स्थापनेची शपथ घेतली, त्याच प्रकारे आज महाशिवरात्रीच्या दिवशी शपथ घेऊन त्याच्या कार्यात योगदान देणे, हीच हिंदूंनी शिव आराधना समजावी. हिंदूंनी 'शिवोपासना करतांना धर्मरक्षणाकरता कोणते योगदान देणार?', याचा संकल्पच करावा. भक्त, देवता आणि राक्षस अशा सर्वांना वर प्रदान करणारे भोलेनाथ असा नावलौकिक असला, तरी असुरांचा अत्याचार बळावल्यावर हेच भगवान शिव रुद्रावतार धारण करतात. दक्ष प्रजापतीने सतीचा अपमान केला, तेव्हा स्वतःची जटा भूमीवर आदळून भगवान शंकरांनी 'वीरभद्र' निर्माण केला. या वीरभद्राने शिवनिंदा करर्णाया दक्ष राजासह त्याच्या सेनेचाही संहार केला. भोलेनाथाच्या या प्रलयकारी रूपाची साक्ष दुष्प्रवृत्तीला करून देण्याची वेळ आली आहे. 'लव्ह जिहाद' करून हिंदु युवतींचे धर्मांतर, आमीष दाखवून हिंदूंचे धर्मांतर, सर्रासपणे चालणारी गोहत्या, हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या, हिंदूंच्या सण-उत्सवांवर आक्रमणे, हिंदूंच्या श्रद्धास्थानांचा अवमान, सनातन हिंदु धर्माला आतंकवादी ठरवण्यासाठी केलेली कूटनीती अशी अनेक औरंगजेबी संकटे आज हिंदु धर्मावर घोंघावत आहेत. त्यांचा सामना करण्यास बळ प्रदान करण्यासाठी हिंदूंनी भगवान शिवाकडे प्रार्थना करावी. समुद्रमंथनाच्या वेळी भगवान शिवाने हालाहल प्राशन केले, त्यामुळे अमृत प्राप्त झाले. त्यामुळे हिंदु धर्माला नष्ट करणाऱ्या विषवल्लीचा सामना करण्यासाठीही हिंदूंनी सिद्ध रहावे. आपण आज शिवाची आराधना करत आहोत; कारण आपण अद्यापही हिंदु आहोत. जर हिंदु धर्मच राहिला नाही, तर कुठली आली उपासना आणि कुठले आले धर्माचरण? 'हिंदु धर्म म्हणजे मलेरिया, डेंग्यू आहे', असे मानणारे निधमीर्वादी आणि दुसऱ्या बाजूला भारताचे इस्लामीस्तान करण्यासाठी टपलेले धर्मांध हे सर्व जण हिंदु धर्माला नष्ट करण्यासाठीच कार्यरत आहेत. पाकिस्तान, बांगलादेश येथील हिंदूंची मंदिरे तोडण्यात आली. तेथे हिंदूंना रहाण्यासाठी स्वतःची हिंदु ही ओळख झाकावी लागते. तीच वेळ देशात बंगाल, केरळ या राज्यांत काही प्रमाणात दिसून येते. देशातील अनेक मुसलमानबहुल भागात महाशिवरात्री, गणेशोत्सव, दिवाळी हे उत्सव साजरे करता येत नाहीत. उत्सव साजरे केलेच, तर हिंदूंच्या हत्या होतात, मिरवणुकांवर दगडफेक होते. याचा अर्थ असा की, धार्मिक उपासना, सण-उत्सव जोपर्यंत आपण हिंदूबहुल आहोत, तोपर्यंतच रहातील, हे हिंदूंनी ध्यानात घ्यावे. भारतातील ज्या भागात हिंदू अल्पसंख्यांक आहेत, त्या ठिकाणी सण-उत्सव साजरे करायला हिंदूंना मर्यादा आहेत. ज्याप्रमाणे काश्मीरमधून हिंदू परागंदा झाले, त्याप्रमाणे भारतात असे अनेक छोटे पाकिस्तान निर्माण होत आहेत की, तेथे एखाद दुसरे हिंदु कुटुंब राहूच शकत नाही. आज देशातील काही भागांमध्ये दिसणारे हे चित्र भविष्यात संपूर्ण भारताचे होऊ नये, यासाठी हिंदूंनी वेळीच जागृत व्हावे. त्यामुळे महाशिवरात्रीनिमित्त केवळ स्वतःसह कुटुंबियांच्या कल्याणासाठी नव्हे, तर राष्ट्र-धर्म यांच्या रक्षणासासाठी हिंदूंनी शिवोपासना करावी आणि अधर्माच्या नाशासाठी रुद्रावतार धारण करणाऱ्या भगवान शिवाच्या धर्मरक्षणाच्या कार्याचे हिंदूंनी अनुकरण करावे. त्यामुळे हिंदूंनी आज केवळ धार्मिक विधी म्हणून नव्हे, तर हिंदु राष्ट्र स्थापनेचा दुग्धाभिषेक म्हणून शिवोपासना करावी!

# कांदा धोरण समितीचे मौन अन् टॅरिफचे संकट

**बाजारात कांद्याचे दर कोसळून शेतकऱ्यांच्या घामाला मातीमोल भाव मिळत असताना, राज्य शासनाने मोठा गाजावाजा करत स्थापन केलेली कांदा धोरण समिती नेमकी कुठे गायब आहे? दुसरीकडे भारत-अमेरिका संबंधांच्या नावाखाली करण्यात आलेल्या तथाकथित 'टॅरिफ करारा'ची गूढताही शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालत आहे. कांदा धोरण समितीची निष्क्रियता आणि आंतरराष्ट्रीय करारांच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या हिताशी होणारी तडजोड, या दोन्ही गोष्टी आज भारतीय शेतीला गंभीर संकटाच्या उंबरठ्यावर आणून उभ्या करत आहेत.**



लासलगावसारख्या देशातील सर्वात मोठ्या कांदा बाजारपेठेत लाल कांद्याला सरासरी प्रतिक्विंटल ११०० रुपयांचा दर मिळतोय, ही बाबच शासनाच्या दाव्यांची पोलखोल करणारी आहे. उत्पादन खर्च, मजुरी, खत-बियाणे, कीटकनाशके, पाणी, वीज, वाहतूक, साठवणूक आणि कर्जावरील व्याज या सगळ्यांचा विचार केला, तर हा दर शेतकऱ्यांसाठी अपमानास्पद आणि विनाशकारी आहे. शेतकरी कांदा नफा कमवण्यासाठी की तोटा सहन करण्यासाठी पिकवतोय? राज्य शासनाने मोठा गाजावाजा करत स्थापन केलेली कांदा धोरण समिती नेमकी कुठे आहे? या प्रश्नांची उत्तरे द्यायला कुणी तयार नाही. ही समिती स्थापन झाली तेव्हा सांगण्यात आले होते की, कांद्याच्या दरात स्थिरता राखली जाईल, शेतकरी, ग्राहक आणि व्यापारी यांचे हितसंबंध संतुलित ठेवले जातील आणि दीर्घकालीन धोरण आखले जाईल. प्रत्यक्षात या समितीचे अस्तित्व केवळ कागदावरच आहे. बाजारात दर कोसळत असताना, या समितीकडून एकही ठोस, परखड, शेतकरीहिताचा अहवाल किंवा उपाययोजना समोर आलेली दिसत नाही.

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत दररोज सुमारे पंचवीस हजार क्विंटल कांद्याची आवक होत आहे. मागणीपेक्षा पुरवठा जास्त असल्याचे कारण पुढे करून दर घसरत असल्याचे सांगितले जाते. हा पुरवठा अचानक वाढलेला नाही. हा पुरवठा सरकारला, नाफेडला, एनसीसीएफला आणि संबंधित यंत्रणांना आधीच माहीत असतो. मग योग्य वेळी निर्यात धोरण स्पष्ट का केले गेले नाही? साठवणुकीचे नियोजन का झाले नाही? प्रक्रिया उद्योगांना चालना का दिली नाही? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, किमान आधारभूत दर जाहीर करून सरकारी खरेदी का करण्यात आली नाही? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी कांदा धोरण समितीची आहे, पण ती समितीच मौन बाळगून बसली आहे. या समितीच्या रचनेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. एक-दोन अपवाद वगळता, बहुसंख्य सदस्य हे सरकारी अधिकारी, सरकारशी संलग्न व्यक्ती किंवा सरकारच्या धोरणांना अनुकूल असलेले आहेत. अशा परिस्थितीत ही समिती सरकारच्या चुकीच्या धोरणांवर बोट ठेवून स्वतंत्र, वस्तुनिष्ठ आणि निर्भीड अहवाल कसा सादर करणार?

सध्या लासलगाव बाजार समितीत कांद्याला किमान ५०० रुपये, कमाल १,४८५ रुपये, तर सरासरी १,१०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. मात्र विक्रीस येणारा कांदा साठवणीयोग्य नसल्याने शेतकऱ्यांना तो तात्काळ विकावा लागत असून उत्पादन खर्चाच्या तुलनेत प्रति क्विंटल ६०० ते ७०० रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. म्हणजेच प्रत्येक क्विंटलमागे शेतकरी थेट तोट्यात जात आहे. हा तोटा आर्थिक, मानसिक आणि सामाजिकदेखील आहे. कर्जबाजारीपणा वाढतोय, घरखर्च भागत नाही, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न उभा राहतोय आणि शेवटी शेतकरी हताश होतोय. शासनाच्या चुकीच्या धोरणांचा फटका शेतकऱ्यांच्या जगण्यावर थेट बसतोय.

नाफेड आणि एनसीसीएफसारख्या संस्थांनी याआधी केलेल्या हस्तक्षेपांमुळे कांदा बाजारात किती गोंधळ निर्माण झाला आहे. कधी निर्यातबंदी, कधी निर्यात शुल्क, कधी अचानक खरेदी, तर कधी अचानक हात झटकून मोकळे होणे, अशा धोरणांमुळे बाजारातील नैसर्गिक समतोलच बिघडतो. शेतकरी उत्पादन घेताना सरकारच्या धोरणांवर विश्वास ठेवतो, पण काढणीच्या वेळी तेच धोरण शेतकऱ्याच्या विरोधात उभे राहते. या सगळ्या चुकीच्या निर्णयांचा आढावा घेऊन त्यावर स्पष्टपणे बोट ठेवण्याचे धाडस कांदा धोरण समितीने दाखवायला हवे होते. मात्र तसे न करता, मल्टिनॅशनल कंपन्यांना फायदा होईल, अशा कांदा स्टोरेजसारख्या संकल्पना पुढे आणल्या जात आहेत. सरकारने शेतीमालाच्या किमती ठरवण्यात अनावश्यक हस्तक्षेप करण्याऐवजी, शेतकऱ्याला त्याच्या मालाला योग्य भाव मिळेल अशी व्यवस्था निर्माण करणे अपेक्षित आहे. बाजारात पारदर्शकता, निर्यात धोरणातील सातत्य, प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन आणि गरज पडल्यास थेट सरकारी खरेदी, हे उपाय सरकार सहज करू शकते. मात्र इच्छाशक्तीचा अभाव आणि धोरणात्मक गोंधळ यामुळे कांदा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे.

एकीकडे कागदी समिती शेतकऱ्यांचे हाल करीत आहे, तर दुसरीकडे भारत-अमेरिका संबंधांच्या नावाखाली करण्यात आलेल्या तथाकथित 'टॅरिफ करारा'ची गूढताही अस्वस्थता वाढवत आहे. सरकारकडून याला ऐतिहासिक यश म्हणून मिरवले जात आहे. ग्रामीण भारतातील शेतकरी मात्र या कराराकडे अस्तित्वाच्या लढाईच्या नजरेने पाहत आहे. या कराराचे परिणाम कागदावर जितके आकर्षक दिसतात, तितकेच ते जमिनीवर भयावह ठरण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसतात. हा करार म्हणजे भारतीय शेती उद्योगाला आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीसमोर फेकण्याचा निर्णय आहे, ज्याची किंमत पुन्हा एकदा शेतकरी वर्गालाच मोजावी लागणार आहे.

आधीच वाढलेला उत्पादन खर्च, बियाणे, खत, कीटकनाशके, वीज, पाणी, मजुरी, वाहतूक यामुळे शेती परवडेनाशी झालेली असताना, हमीभावाचा प्रश्न अजूनही कागदावरच अडकलेला आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेसारख्या देशातून स्वस्त शेतीमाल कोणत्याही कराविना भारतीय बाजारपेठेत येणार असेल, तर देशांतर्गत शेतकरी कसा टिकणार? हा करार शेतकऱ्यांना स्पर्धेत उतरवतोय, पण ती स्पर्धा समान पातळीवरची नाही, हेच खरे भयावह वास्तव आहे. अमेरिकन शेतकऱ्यांकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान, मोठ्या प्रमाणावर सरकारी अनुदाने, विमा संरक्षण, साठवणूक सुविधा आणि खुल्या बाजारपेठा उपलब्ध आहेत. त्याउलट भारतीय शेतकरी अजूनही हवामानावर, पावसावर आणि सरकारी धोरणांच्या अनिश्चिततेवर अवलंबून आहे. भारतात जी.एम. बियाण्यांवर बंदी आहे, तर अमेरिकेत जी.एम. पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. जी.एम. पिके म्हणजे जनुकीय बदल केलेली पिके. निसर्गाने दिलेल्या बियाण्यांच्या डीएनएमध्ये प्रयोगशाळेत बदल करून तयार केलेल्या या पिकांमुळे उत्पादन खर्च कमी आणि उत्पादन जास्त होते. अशा परिस्थितीत भारतीय शेतर्कयाने अमेरिकन शेतकऱ्यांशी स्पर्धा करावी, ही अपेक्षाच मुळात अन्यायकारक आहे.

भारतीय शेतीमाल अमेरिकेत निर्यात करताना तब्बल १८ टक्के कर आकारला जातो. म्हणजे एकीकडे अमेरिकन मका, सोयाबीन, कापूस, दूध, डेअरी उत्पादने शून्य करात भारतात येणार आणि दुसरीकडे भारतीय शेतर्कयांचा माल जादा कराच्या ओझ्याखाली दबला जाणार. हे धोरण कसे समतोलाचे म्हणायचे? हे तर सरळसरळ शेतकरीविरोधी आणि परकीय उत्पादकांच्या फायद्याचे धोरण ठरते. सरकार 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत'च्या घोषणा देत असताना, प्रत्यक्षात मात्र आयातदारांसाठी रेड कार्पेट अंथरण्यात येतेय आणि देशांतर्गत उत्पादकांना कार्पेटखाली दाबले जात आहे.

भारतातील दुग्धव्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कोट्यवधी छोटे शेतकरी आणि पशुपालक या व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यांच्या गाई, म्हशी या घरच्या कुटुंबातील सदस्यांसारख्या असतात. अशा पार्श्वभूमीवर अमेरिकन डेअरी उत्पादने भारतीय बाजारात शिरकाव करणार असतील, तर त्याचा फटका थेट ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नावर बसेल. भारताची सुमारे ६० टक्के लोकसंख्या आजही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. ही शेती अजूनही मोठ्या प्रमाणात पारंपरिक पद्धतीने केली जाते. यामागे शेतकऱ्यांची मागास मानसिकता नाही, तर धोरणात्मक दुर्लक्ष आहे. सिंचन, संशोधन, बाजारपेठ, प्रक्रिया उद्योग, साठवणूक, निर्यात धोरण या सगळ्या बाबतीत भारतीय शेतकरी दशकानुदशके उपेक्षित राहिला आहे. अशा वेळी त्याला थेट जागतिक बाजारपेठेच्या रिंगणात उतरवणे म्हणजे त्याला वाघासमोर उभे करण्यासारखे आहे.

सरकार हे जाणूनबुजून करत आहे. खरे तर सरकारचे हे निर्णय काही निवडक उद्योगपती आणि आयातदारांच्या हितासाठीच आहेत. स्वस्त आयात होईल, मोठ्या कंपन्यांना प्रक्रिया, पॅकेजिंग आणि विक्रीतून नफा मिळेल, पण शेतर्कयांच्या हातात मात्र मातीच येईल. हा अनुभव शेतर्कयांनी आधीही घेतला आहे. कापूस, डाळी, तेलबिया यामध्ये आयातीमुळे भाव कोसळले आणि नुकसान शेतकऱ्यांचे झाले. आता तोच प्रयोग पुन्हा, पण अधिक व्यापक स्वरूपात केला जात आहे. त्यामुळे भारतीय शेती उद्योग मोडकळीस येईल. भारत-अमेरिका व्यापार करारामुळे भारतीय शेतकऱ्यांसमोर उभे राहिलेले आव्हान हे अस्तित्वाचे आहे. अमेरिकन शेतर्कयांना सरकारकडून संरक्षण दिले जाते, त्यांचे नुकसान भरून काढले जाते, त्यांना उत्पादन खर्चावर आधारित दर मिळतात. भारतीय शेतकऱ्यांना मात्र अजूनही उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळत नाही. भाव पडले तर बाजाराचा नियम, भाव वाढले तर निर्यातबंदी, साठेबाजी कायदे, आयात, असे सगळे शस्त्र शेतर्कयाविरुद्ध वापरले जाते. अशा असमान परिस्थितीत स्पर्धा शक्य आहे, असे म्हणणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. आज शेतकरी धोरणात्मक न्याय मागतो आहे. त्याला परकीय शेतर्कयांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी समान संधी, समान नियम आणि समान संरक्षण हवे आहे. जर सरकार हे देऊ शकत नसेल, तर अशा करारांमुळे देशाच्या अन्नसुरक्षेवर, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि सामाजिक स्थैर्यावर दीर्घकालीन परिणाम होतील. ट्रम्प प्रशासनासोबतचा हा तथाकथित टॅरिफ करार शेतकऱ्यांसाठी संधी नाही, तर संकटाची घंटा आहे. सरकारने शेतर्कयांचा आवाज ऐकावा, या करारातील अटी स्पष्ट कराव्यात आणि भारतीय शेतीच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. अन्यथा हा करार भारतीय शेती उद्योगाच्या ऱ्हासाची सुरुवात ठरेल.

# महायुतीची हॅट्ट्रिक



नगरपालिका आणि महापालिकांपाठोपाठ राज्यातील बारा जिल्हा परिषदांमध्ये वर्चस्व राखून राज्यातील सत्ताधारी महायुतीने विजयाची हॅट्ट्रिक साधली आहे. त्यामध्येही भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत; तर शिवसेनेने कोकण-मराठवाड्यात राखलेला वरचष्मा लक्ष वेधून घेणारा आहे. सांगली, कोल्हापूर आणि लातूरमध्ये विरोधकांनी चांगली लढत दिली. मात्र, बहुतांश जिल्हा परिषदांमध्ये सत्तास्थापनेसाठी महायुतीला एकत्र येण्याची गरज भासणार आहे; त्याप्रमाणेच मनापासून ऐक्य घडवून योग्य खेळी खेळल्यास विरोधकांनाही दोन-तीन जिल्ह्यांत सत्ता राखता येऊ शकेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गुणतालिकेत या निकालांनी आणखी काही गुणांची भर घातली आणि एकनाथ शिंदे यांनीही आपला पक्ष स्पर्धेत टिकवून ठेवत विजयाचा गुलाल उधळला. स्थानिक मजबूत नेतृत्वाने लक्ष घालून लढवलेल्या निवडणुकांचा अपवाद वगळता विरोधकांचे मात्र पानिपत झाले, हाच या ग्रामीण भागातील जनादेशाचा अर्थ.इतर मागासवर्गाच्या आरक्षणामुळे एकूण आरक्षणाने घटनात्मक ५० टक्क्यांची मयार्दा ओलांडल्याने राज्यातील जिल्हा परिषदांच्या निवडणुका लांबल्या. सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवल्याने एकूण ३४ पैकी आरक्षणाचा पेच नसलेल्या १२ ठिकाणी निवडणुका झाल्या. त्यामध्ये सत्ताधारी भाजपने वरचष्मा राखला. त्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या पक्षांचा क्रमांक लागतो. हाती असलेल्या विविध यंत्रणा आणि संघटनेचा या विजयात मोठा वाटा आहे; त्याप्रमाणेच 'लाडकी बहीण'सारख्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचीही जादू मतदारांमध्ये टिकून असल्याचे दिसून येते. जलजीवन मिशनसारख्या योजनांचेही योगदान महायुतीच्या विजयात आहे. विविध जिल्ह्यांमधील 'स्थानिक सुभेदार' यंदा भाजप आणि शिवसेनेच्या गोटात दाखल झाले होते. त्यामुळे अनेक जिल्ह्यांत विरोधक निष्प्रभ असताना सत्ताधारी पक्षांमध्येच वर्चस्वाची लढाई दिसली.

# अस्मितावादी चौकटीत अडकलेला समाज



**भारतीय समाज आज एका विचित्र विरोधाभासातून जात आहे. दैनंदिन व्यवहारात भारतीय लोकजीवन आधुनिकतेची सर्व उपकरणे स्वीकारताना दिसते-स्मार्टफोन, डिजिटल पेमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता, जलद वाहतूक, जागतिक बाजाराशी जोडलेली अर्थव्यवस्था. मात्र याच समाजाचे वैचारिक जीवन अजूनही इतिहासातील अस्मितावादी चौकटीत अडकलेले आहे. या विसंगतीचा थेट परिणाम सामाजिक विकासावर होत असून प्रगतीच्या प्रक्रियेत गंभीर अडथळे निर्माण होत आहेत.**

आजचा भारतीय नागरिक व्यवहारात अत्यंत व्यावहारिक आणि आधुनिक आहे. तो तंत्रज्ञानाचा वापर करून आपले जीवन सुलभ करतो, उत्पादनक्षमता वाढवतो आणि जागतिक पातळीवरील स्पर्धेत टिकून राहण्याचा प्रयत्न करतो. मात्र जेव्हा प्रश्न सामाजिक मूल्यांचा, समतेचा, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा किंवा लोकशाहीचा येतो, तेव्हा समाजाचा मोठा भाग अजूनही जात, धर्म, पंथ, परंपरा आणि तथाकथित गौरवशाली इतिहासाच्या चौकटीत अडकलेला दिसतो. प्रागतिक विचारसरणीच्या दृष्टिकोनातून पाहता, ही परिस्थिती केवळ सांस्कृतिक नसून ती आर्थिक आणि राजकीय संरचनेशी निगडित आहे. उत्पादन संबंध आधुनिक झाले असले तरी सामाजिक जाणिवा आणि वर्गभान विकसित न झाल्यामुळे समाज प्रगतीच्या पुढील टप्प्यावर जाऊ शकत नाही.

सध्याच्या काळात अस्मितेचे राजकारण हे सत्ताधारी वर्गाचे एक प्रभावी साधन बनले आहे. रोजगार, महागाई, शिक्षण, आरोग्य, शेतकरी प्रश्न यांसारख्या मूलभूत मुद्द्यांवर चर्चा होण्याऐवजी समाजाला इतिहासातील संघर्ष, धार्मिक प्रतीके आणि सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या कथांमध्ये गुंतवून ठेवले जाते. यामुळे वास्तवातील वर्गसंघर्ष झाकला जातो आणि शोषणाची रचना अबाधित राहते. इतिहासाचा अभ्यास वैज्ञानिक आणि चिकित्सक पद्धतीने होणे आवश्यक असताना, तो भावनिक गौरवगाथांपुरता मर्यादित केला जात आहे. प्रागतिक विचारांच्या मते, इतिहास समाजाच्या स्थितीचा म्हणजेच संघर्षाचा, उत्पादन पद्धतींचा आणि विविध स्तरातील जनसमूहाच्या सत्तासंबंधांचा अभ्यास असतो; तो कोणत्याही एका अस्मितेच्या उदात्तीकरणासाठी वापरणे हे समाजाला मागे नेणारे आहे. या वैचारिक मागासलेपणाचा थेट परिणाम सामाजिक विकासावर होतो. जातीय भेदभाव, धार्मिक ध्रुवीकरण, स्त्री-पुरुष असमानता, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव-हे सर्व प्रश्न आजही तीव्रतेने उपस्थित आहेत. आधुनिक तंत्रज्ञान असूनही अंधश्रद्धा फोफावतात, शिक्षण असूनही विवेकाचा अभाव दिसतो. प्रागतिक विचारसरणीच्या मते, सामाजिक विकास हा केवळ आर्थिक वाढीने मोजता येत नाही. तो समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित असला पाहिजे. मात्र जेव्हा समाज वैचारिकदृष्ट्या इतिहासात अडकतो, तेव्हा तो वर्तमानातील प्रश्नांना सामोरे जाण्याची क्षमता गमावतो. इतिहासाची माहिती आपल्या असायला हवी, पण त्याचे ओझे मानगुटीवर येता काम नये. अन्यथा त्या ओज्याने आपली मान वाकून जाते. ताठ मानेने भविष्याला समोरे जाण्याची शक्ती गळून पडते. त्यामुळे इतिहासातून स्फूर्ती घेऊन नव्या भविष्याकडे जायला हवे, पण आपण इतिहासाचे गुलाम होता कामा नये. त्यात पुन्हा इतिहास हा होऊन गेलेल्या घटनांचा क्रम असतो, त्यामुळे त्यात किती अडकवून रहावे, याचा विचार आवश्यक असतो. अन्यथा अनेकांचे जीवन इतिहासमय होऊन जाते. त्यांना वर्तमान आणि भविष्यकाळ दिसतच नसतो. असे होणे योग्य नसते. कारण भविष्यकाळ दिसला नाही तर ती व्यक्ती आणि समाज यांची अधोगती आहे.

सध्याच्या राजकीय संदर्भात या वैचारिक विसंगतीला नवउदारमतवादी अर्थव्यवस्थेची स्पष्ट किनार आहे. १९९१ नंतर स्वीकारलेल्या नवउदार धोरणांमुळे राज्याची सामाजिक जबाबदारी कमी होत गेली. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सार्वजनिक सेवा हळूहळू बाजाराच्या हवाली करण्यात आल्या. परिणामी आर्थिक विषमता वाढली, सर्वसामान्य मेहनत करणाऱ्याचे व जनतेचे हक्क कमकुवत झाले आणि असंघटित क्षेत्रात प्रचंड वाढ झाली आहे. या आर्थिक अपयशावर पडदा टाकण्यासाठी अस्मितेचे राजकारण प्रभावीपणे वापरले जात आहे. धर्म, जात, भाषा आणि राष्ट्रवादाच्या भावनिक मुद्द्यांद्वारे जनतेचे लक्ष मूलभूत आर्थिक प्रश्नांपासून दूर नेले जाते. प्रागतिक भौतिकवादी दृष्टिकोनातून पाहता, ही प्रक्रिया म्हणजे अधिरचनेच्या माध्यमातून उत्पादन संबंधांतील शोषण लपवण्याचा प्रयत्न आहे. माध्यमे या प्रक्रियेत निर्णायक भूमिका बजावत आहेत. मुख्य प्रवाहातील माध्यमांचा मोठा भाग कॉर्पोरेट हितसंबंधांशी जोडलेला असल्याने, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, कामगार संघर्ष, खासगीकरणाचे दुष्परिणाम यांना दुय्यम स्थान दिले जाते. त्याऐवजी धार्मिक व सांस्कृतिक वाद, इतिहासाचे एकांगी सादरीकरण आणि राष्ट्रवादी उन्माद यांना प्राधान्य दिले जाते. यामुळे समाजाचा वैचारिक अवकाश अधिकच संकुचित होत आहे. आज भारतीय समाजात उत्पादन शक्ती आधुनिक झाल्या असल्या तरी उत्पादन संबंध अजूनही विषम आणि शोषणाधिष्ठित आहेत. सार्वजनिक क्षेत्र कमकुवत करून खासगी भांडवलाला मोकळे रान देण्यात आले आहे. या प्रक्रियेत निर्माण होणारी बेरोजगारी, अस्थिर रोजगार आणि वाढती विषमता ही केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक संकटे आहेत. अलीकडील विविध सरकारी व स्वतंत्र अहवालांनुसार, देशातील तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. उच्चशिक्षित तरुणही कंत्राटी, अस्थायी किंवा कमी वेतनाच्या नोकऱ्यांवर अवलंबून राहण्यास मजबूर आहेत. महाराष्ट्रात शहरी भागात सेवा क्षेत्रातील रोजगार अस्थिर झाले असताना, ग्रामीण भागात शेतीवरील उत्पन्न घटत चालले आहे. शेतमालाला योग्य दर न मिळणे, वाढता उत्पादनखर्च आणि हवामान बदलाचे परिणाम यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था संकटात आहे. रेल्वे, वीज, शिक्षण, आरोग्य, विमा आणि बँकिंग क्षेत्रात खासगीकरणाचा वेग वाढलेला दिसतो. महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कमकुवत झाल्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील लोकांना महागड्या खासगी सेवांवर अवलंबून राहावे लागत आहे. शिक्षण क्षेत्रात खासगीकरणामुळे गुणवत्तेऐवजी नफा हेच मुख्य उद्दिष्ट बनले असून, गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण अधिकच दुर्मिळ होत आहे. माध्यम क्षेत्रात वाढते एकाधिकरण हे लोकशाहीसाठी गंभीर धोका ठरत आहे. काही मोजक्या कॉर्पोरेट घराण्यांच्या हाती टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांचे नियंत्रण केंद्रित होत आहे.

महाराष्ट्रासह संपूर्ण देशात कामगार आंदोलन, शेतकरी मोर्चे, आदिवासी जमीनहक्कांचे प्रश्न यांना मर्यादित कव्हरेज दिले जाते, तर धार्मिक व सांस्कृतिक मुद्द्यांना अतिप्रमाणात प्रसिद्धी दिली जाते. या माध्यमीय मांडणीमुळे शहरी मध्यमवर्ग आणि ग्रामीण श्रमिक वर्ग यांच्यातील वास्तवातील दरी झाकली जाते. वर्गीय प्रश्नांचे रूपांतर सांस्कृतिक संघर्षात केले जाते-हीच नवउदार आणि अस्मितावादी राजकारणाची संयुक्त रणनीती आहे. महाराष्ट्र हे औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्य मानले जात असले, तरी येथे ग्रामीण-शहरी विषमता तीव्र आहे. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांमध्ये कॉर्पोरेट भांडवलाचा विस्तार होत असताना, मराठवाडा, विदर्भ आणि आदिवासी पट्ट्यात बेरोजगारी, स्थलांतर आणि दारिद्र्य वाढताना दिसते. शहरी भागात स्मार्ट सिटी, मेट्रो प्रकल्पांची चर्चा होत असताना, ग्रामीण भागात पाणी, आरोग्य आणि शिक्षणाच्या मूलभूत सुविधा अर्पुया आहेत.

आज भारतीय समाजासमोर खरा प्रश्न आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याचा नाही, तर आधुनिक, वैज्ञानिक आणि भौतिकवादी विचार स्वीकारण्याचा आहे. नवउदारमतवादाच्या अपयशावर अस्मितेच्या राजकारणाची मलमपट्टी केली जात असून, माध्यम एकाधिकरणाद्वारे या प्रक्रियेला वैचारिक वैधता दिली जात आहे. प्रागतिक विचारांचा आग्रह स्पष्ट आहे-इतिहासपूजा नव्हे तर इतिहासाचे भौतिकवादी विश्लेषण, अस्मितेचा गौरव नव्हे तर वास्तविक जीवनाची जाणीव, आणि कॉर्पोरेट-केंद्री विकास नव्हे तर सामान्य जनता-केंद्रित सामाजिक परिवर्तन. व्यवहारात आधुनिक झालेला भारत वैचारिकदृष्ट्याही आधुनिक, समतावादी आणि प्रगतिशील झाला, तरच सामाजिक विकासाचा मार्ग मोकळा होईल; अन्यथा आधुनिक साधने वापरणारा पण मागास विचारांनी चालणारा समाज हीच आपली शोकांतिका ठरेल. आज भारतीय समाजासमोर खरा प्रश्न आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याचा नाही, तर आधुनिक, वैज्ञानिक आणि भौतिकवादी विचार स्वीकारण्याचा आहे. जोपर्यंत समाज अस्मितेच्या काल्पनिक भिंतींमध्ये अडकून राहील, तोपर्यंत आर्थिक शोषण, सामाजिक विषमता आणि लोकशाहीची पीछेहाट थांबणार नाही. प्रागतिक विचारांचा आग्रह स्पष्ट आहे-इतिहासपूजा नव्हे तर इतिहासाचे विश्लेषण, अस्मितेचा गौरव नव्हे तर वर्गसंघषार्ची जाणीव, आणि बाजारकेंद्री विकास नव्हे तर मानवकेंद्रित सामाजिक परिवर्तन. व्यवहारात आधुनिक झालेला भारत वैचारिकदृष्ट्याही आधुनिक, प्रगतिशील आणि समतावादी झाला, तरच खऱ्या अर्थाने सामाजिक विकास शक्य होईल. अन्यथा आधुनिक साधने वापरणारा पण मध्ययुगीन विचारांनी चालणारा समाज हीच आपली शोकांतिका ठरेल.



## कैरी-दुधीचा मुरांबा

**साहित्य:** दुधी भोपळ्याचा कीस ३ वाट्या, कैरीचा कीस १/२ वाटी, साखर ३-१/२ वाट्या, वेलची पूड २ चमचे, केशरकाड्या १/२ चमचा.


**कृती:** प्रथम दुधी भोपळा व कैरी वेगवेगळे किसून घेऊन नंतर एकत्र करणे व त्यात साखर घालून १० मिनिटे तसेच ठेवणे, साखर हळूहळू विरघळू लागेल नंतर गॅसवर ठेवून उकळणे. साधारण एकतारी झाला असे वाटले की गॅस बंद करून त्यात केशर व वेलची पूड एकत्र करून थंड झाल्यावर बाटलीत भरणे. पारदर्शक असा हा मुरांबा दुधी भोपळा प्रकृतीने थंड असल्यामुळे उन्हाळ्यात अतिशय उत्तम.

# हेअर कलर करा पण सांभाळून...

**आजकाल मुली असो वा स्त्रिया हेअर कलर करण्याचं क्रेझ वाढलं आहे. सध्या लेटेस्ट रंग वापरून आपल्या पर्सनालिटीला एक वेगळा लुक देता येतो. अलीकडे ब्राऊन, चॉकलेट, बरगंडी आणि ब्लैंड फॅशनमध्ये आहे. त्यातून हायलायटिंगचा ट्रेंड आहे. मात्र केसांना कलर देण्यापूर्वी त्यांचा प्रकार समजून घेणं गरजेचं आहे.**

### कलर करण्यापूर्वी हे करा

- कलर करण्यापूर्वी हेअर कटिंग किंवा ट्रिमिंग करून घ्या.
- कलरिंगसाठी दिलेल्या निदेर्शांक पुस्तिकेत सांगितल्याप्रमाणे हेअर कलर करण्यापूर्वी ॲलर्जी टेस्ट करून घ्या.
- कलर वापरण्यापूर्वी दिलेल्या सूचना नीट वाचून घ्या.
- आपल्या केसांवर पूर्वी कधीच रंगांचा वापर केलेला नाही की ते आधीपासूनच रंगलेले आहेत. जे जाणून घेतल्यानंतर योग्य रंगाची निवड करा.
- कलर निवडण्यापूर्वी काही शंका असेल तर हेअर एक्सपर्टचा सल्ला घ्या.
- कलर करण्यापूर्वी एकाच आकाराचे फॉइल तयार ठेवा.
- अता व्ही शेपमध्ये केस घेऊन त्याचे पातळ सेक्शन करून घ्या. त्याखाली फॉइल ठेवून केसांना कलर करा आणि दोन्ही बाजूने दुमडून फोल्ड करा. हायलाइट एकासारखं असावं हे लक्षात असू द्या.
- कलर झाल्यावर अर्ध्या तासाने फॉइल काढा आणि केस धुऊन शेपू करा. केस वाळल्यावर वेगळाच लुक येईल.





### हे करू नका

- कलर करताना केसांच्या मुळांना कलर लावू नका.
- वयाने जास्त असलेल्या स्त्रियांनी डार्क रंगाचा वापर करू नये.
- ओल्या केसांमध्ये कलर करू नये याने कलर स्कल्पवर पसरतो.
- कलर केलेले केस कधीच गरम पाण्याने धुऊ नये. याने कलर फिकट होऊ लागतो.
- दुसयांचं पाहून रंगाची निवड करू नये. आपल्याला जो शोभेल तोच कलर वापरा.

# चॉकलेट खाण्याचे हे आहेत फायदे

**चॉकलेट कोणाला आवडत नाही? लहानापांसून थोरामोठ्यांपर्यंत चॉकलेट आवडीने खातात. मात्र दातांवर परिणाम होऊ नये यासाठी काहीजण चॉकलेट खात नाहीत. मात्र तुम्हाला माहीत आहे का चॉकलेट खाण्याचेही अनेक आश्चर्यकारक फायदेही आहेत.**

**तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर** – तणाव कमी करण्यासाठी चॉकलेट अधिक फायदेशीर आहे. डार्क चॉकलेट खाण्याने तणाव कमी होतो. उच्च रक्तदाबाचा त्रास कमी करण्यासाठी चॉकलेटचे सेवन परिणामकारक ठरते. कोकोमध्ये असलेले अँटीऑक्सिडंटस्‌ स्वास्थ चांगले राखण्यासाठी मदतशीर ठरतात. हृदयासाठीही चॉकलेट फायदेशीर आहे. चॉकलेटच्या सेवनाने हृदयरोगाची शक्यता कमी होते. चॉकलेट खाण्याने व्यक्तीचा मूड सुधारतो. कोकोच्या सेवनाने थकवा कमी होण्यास मदत होते.

**वजन घटवण्यात गुणकारी** – ॅलिफोर्नियाच्या सॅन डिगो विद्यापीठात करण्यात आलेल्या संशोधनानुसार नियमितपणे चॉकलेट खाल्ल्याने वजन कमी होण्यात मदत होते. वैज्ञानिकांनुसार चॉकलेटमधील कोको फ्लॅवनॉल वाढत्या वयासंबंधित आजारांना दूर ठेवते. अमेरिकेच्या संशोधनानुसार, रोज हॉट चॉकलेटचे दोन कप सेवन केल्यास मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. तसेच स्मरणशक्तीही वाढते.



# प्रेग्नन्सी दरम्यान कारल्याचे सेवन करावे की करु नये, दूर करा कन्फ्यूजन

गर्भावस्थेत स्त्रिया आपल्या खाण्यापिण्याबद्दल फारच कॉन्शियस होऊन जातात. काय खायला पाहिजे काय नाही, या बद्दल बऱ्याच गर्भवती स्त्रियांना योग्य माहिती नसते. बऱ्याच महिला गर्भावस्थेत कारले खायला पाहिजे की नाही याबद्दल भ्रमित असतात. तर त्यांचे कंफ्यूजन आपण दूर करू. गर्भावस्थेदरम्यान कारल्याचे सेवन आई आणि बाळ दोघांच्या आरोग्यासाठी एक उत्तम विकल्प साबीत होऊ शकते. कारल्यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, बीटा-केरोटिन आणि आयट्री फायबर असत जे गर्भात वाढणारे बाळ आणि आई दोघांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असत.



**फायबरचे प्रमाण जास्त असतात :** कारल्यात फायबर उच्च मात्रेत असत ज्यामुळे भूक लवकर लागत नाही. हे हाय कॅलोरी फूड्स आणि जंक फूड्सच्या क्रेविंग्सला कमी करतो. त्याशिवाय हे प्रेग्नेंसीदरम्यान तुम्हाला लठ्ठ होण्यापासून देखील तुमचा बचाव करतो.

**टीऑक्सीडेंट असतो :** कारल्यात व्हिटॅमिन सी असत, जे एंटीऑक्सीडेंट असून गर्भवती महिलांना हानिकारक बॅक्टेरियापासून लढण्याची शक्ती देत. हे गर्भवती महिलांच्या रोगप्रतिकारकला देखील वाढवण्यास मदत करतो आणि रोगप्रतिकारक सिस्टमला बूस्ट करतो.

**बॉवेल मुव्हमेंटला योग्य ठेवतो :** कारले पेरिस्टालिसिसला बूस्ट देण्यास देखील मदत करतो जे नंतर बॉवेल हालचालला नियंत्रित करणे आणि गर्भवती महिलांच्या पचन तंत्राला योग्य करण्यात मदत करतो. कारले पचन तंत्राशी निगडित इतर समस्यांमध्ये देखील आराम देण्यास मदत करतो.

**फोलेट उच्च प्रमाणात असतो :** गर्भवती महिलांसाठी फोलेटची आवश्यकता असते. हे मिनरल्स संभावित न्यूरल ट्यूब डिफेक्टला सुरक्षित ठेवण्यास मदत करतो. कारल्यात फोलेटची मात्रा फार जास्त असते. यामुळे गर्भवती महिलांमध्ये या मिनरल्सच्या दैनिक आवश्यकतेचे एक चतुर्थांश भाग आहे.

**अभ्रकाचा विकास करतो :** कारल्यात काही खास प्रकारचे व्हिटॅमिन्स आणि मिनिरल्सचा एक मोठा स्रोत असतो. यात आयरन, नियासिन, पोटॅशियम, पेंटोथेनिक ॲसिड, जिंक, पाइरोडॉक्सिन, मॅग्नीशियम आणि मँगनीज सामील आहे. याला म्हणून आपण सुपर भाजी म्हणू शकतो कारण हे भ्रूणच्या विकासात एक महत्त्वाची भूमिका बजावतो.

# बदलत्या वातावरणातील आजार टाळण्यासाठी करा घरगुती उपाय

**सतत बदलत्या हवामानामुळे साथीचे रोग पसरत आहेत. मुंबईत नेहमीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात साथीचे रोग पसरण्यास सुरुवात झाली असून अनेक मुंबईकर यामुळे आजारी पडले आहेत. मुंबई महापालिकेच्या आणि खासगी रुग्णालयांमध्ये सध्या साथीच्या रोगांमुळे आजारी पडलेल्या रुग्णांची गर्दी दिसून येत**



**आले :** सर्दी खोकल्यावरील गुणकारी औषध म्हणून प्रचलित आहे. आल्याचा रस व मध सम प्रमाणात बाटलीमध्ये साठवून दोन-दोन चमचे दोन वेळा घेतल्यास सर्दी, खोकला, पडसे आणि स्वरभंग बरे होतात. अजीर्ण झाल्यास आल्याच्या रसात लिंबाचा रस व मीठ घालून पाणी प्यावे. आले तोंडात ठेवताच लाळग्रंथी सक्रिय होतात.

**तुळस :** ताप आल्यावर तुळशीचा रस पायल्यानंतर ताप कमी होतो. मलेरिया आणि डेंग्यू झाल्यानंतरही तुळशीचा रस प्यायल्यावर आराम मिळतो. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि वार्धक्य कमी करण्यासाठी तुळशीचा रस प्यायल्याने फायदा मिळेल. तुळशीमध्ये इगेनॉल हे द्रव्य असल्याने मधुमेह रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी ही फायदा होतो. आताच्या बदलत्या वातावरणात बाहेरचे पदार्थ खाणे शक्यतो टाळा. त्याचप्रमाणे वेळेत डॉक्टरांचा सल्ला घ्यायला मात्र विसरू नका.

# चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी आजमावा हे उपाय



**चाळिशी उलटून गेल्यानंतर चेहऱ्यावर दिसू लागणाऱ्या प्रौढत्वाच्या खुणा आजकालच्या काळामध्ये ऐन विशीमध्येच काहींच्या चेहऱ्यांवर दिसून येतात. अयोग्य, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव, तणावपूर्ण जीवनशैली, सौंदर्यप्रसाधनांचा सातत्याने वापर, सतत उन्हामध्ये त्वचेवर येणारे काळसर डाग, यामुळे ऐन पंचविशीतील तरुण-तरुणी चाळिशी पार केल्यासारखे दिसू लागतात. चेहऱ्यावर पिग्मेंटेशन दिसू लागते, बारीक सुरकुत्या पडू लागतात, त्वचा निस्तेज, कोरडी दिसायला लागून, ढिली पडून लटकूही लागते. या सर्व गोष्टींमुळे चेहरा अनाकर्षक दिसू लागतो. या सर्व समस्या टाळून चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी काही नैसर्गिक उपाय आजमावता येऊ शकतात.**

**अननस :** चेहऱ्यावरील त्वचा ढिली पडून अनेक ठिकाणी लटकल्याप्रमाणे दिसू लागते. त्वचा पुन्हा 'firm' बनवण्यासाठी अननसाचा वापर हा चांगला पर्याय ठरतो. अननसाचा वापर करण्यासाठी अननसाची साले काढून टाकावीत. अननसाच्या गराचे बारीक तुकडे करून घेऊन हे तुकडे चेहऱ्यावरून हळुवार हाताने फिरवावेत, अथवा अननसाचा गर पिळून रस काढून घ्यावा आणि हा रस चेहऱ्यावर लावावा. हा रस काही वेळ चेहऱ्यावर राहू देऊन त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. हा उपाय काही दिवस दररोज करावा.

अननसाचा रस नैसर्गिक 'astringent' असल्याने ढिली पडलेली त्वचा पुन्हा कसण्यास हा रस अतिशय उपयुक्त ठरतो. हा उपाय अवलंबायचा झाल्यास आपण वापरणार असलेले अननस ताजे आणि पिकलेले असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच अननसाचा रस आधी मनगटाच्या आतील बाजूला लावून पाहावा आणि काही वेळ वाट पहावी. या रसामुळे कोणत्याही प्रकारची ॲलर्जी नसल्याची खात्री पटल्यानंतरच हा रस चेहऱ्यावर लावावा.



**आहार :** आपल्या आहारामध्ये सुका मेवा, तेलबिया, अंडी, मासे, डाळी, मटार, शेंगभाज्या, ताजी फळे, टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या इत्यादी पोषक अन्नपदार्थांचा समावेश असेल याची काळजी घ्यावी. आपल्या आहारामध्ये तळलेले पदार्थ, प्रोसेस्ड अन्नपदार्थ, अल्कोहोल, काबोर्नेटेड किंवा कॅफिनेटेड पेये, साखरेचे प्रमाण जास्त असल्यास त्यामुळे त्वचेच्या नव्या पेशी तयार होण्यामध्ये अडचण येत असते. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन आपल्या आहारामध्ये अतिशय मर्यादित असावे.



**कोरफड :** ॅहेऱ्यावरील अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी कोरफडीचा ताजा गर वापरावा. कोरफडीच्या ताज्या गरामध्ये गुलाबजल घालून पेस्ट तयार करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून हलक्या हाताने मालिश करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर वीस मिनिटे राहू देऊन यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवून टाकावा. कोरफडीचा गर आणि गुलाबजल मिसळून तयार केलेल्या पेस्टमुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. कोरफडीमुळे चेहऱ्यावरील टिश्यू रिपेअर होण्यास मदत होऊन त्वचा तजेलदार दिसू लागते. कोरफडीप्रमाणे टी ट्री ऑइल आणि ऑलिव्ह ऑइल यांचे मिश्रणही चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करून त्वचा तजेलदार बनण्यास सहाय्यक आहे.

**टी ट्री – ऑलिव्ह ऑइल :** एक लहान चमचा टी ट्री ऑइल, एक मोठा चमचा ऑलिव्ह ऑइलमध्ये मिसळून याने रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर मालिश करावी. हे तेल रात्रभर चेहऱ्यावर राहू देऊन सकाळी चेहरा थंड पाण्याने धुवावा.

# सात फायदे लसूण आणि मध एकत्र मिक्स करून खाण्याचे...

**लसूण मसालेदार खाण्याचे स्वाद वाढवतो. तसेच याचे गुणकारी आणि आरोग्यदायी फायदे खूप आहेत. लसूण आणि मध एकत्र मिक्स केल्याने आरोग्याचा खूप मोठा खजिना तुमच्याकडे येतो. असे केल्याने सौंदर्यासंबंधी समस्या दूर होऊ शरीर डिटॉक्स करण्यासाठी खूप मदत करतो. तसेच इन्फेक्शनही संपवतो. अशात मध आणि लसूण खाल्ल्यास सात फायदे होतात.**

**हृदयाला निरोगी ठेवतो :** लसूण आणि मध यांचे मिश्रण खायाने हृदयाकडे जाणाऱ्या धमण्यांमधील ब्लॉकेजेस निघून जातात. यामुळे ब्लड सर्क्युलेशन योग्य प्रकारे हृदयापर्यंत पोहोचते.



**सर्दी आणि पडसं दूर करते :** हे मिश्रण खाल्ल्याने सर्दी आणि पडशासह सायनसचा प्रॉब्लेम खूप कमी होतो. हे मिश्रण शरीरातील उष्णता वाढवते. आजारांना दूर ठेवते.

**इम्युन सिस्टीमला मजबूत करते :** लसूण आणि मधाच्या मिश्रणाने तुमची इम्युन सिस्टिम मजबूत होते. यामुळे तुम्ही प्रत्येक ऋतूमध्ये तंदुरुस्त राहू शकता.

**डायरियापासून बचाव :** कोणाला किंवा लहान मुलांना सतत डायरियाचा त्रास होत असेल तर त्यांना हे मिश्रण खाऊ घाला. त्यांची पचन संस्था दुरुस्त होईल. तसेच पोटातील इन्फेक्शन दूर होईल.

**डिटॉक्स :** हे एक नैसर्गिक डिटॉक्स मिश्रण आहे. हे खाल्ल्याने शरीरातील घाण आणि वेस्ट मटेरियल बाहेर पडते.

**फंगल इन्फेक्शन :** फंगल इन्फेशन, शरीराच्या कोणत्याही भागावर हल्ला करत असेल तर ॲण्टी बॅक्टेरियल गुणांचे हे मिश्रण त्या ठिकाणी लावल्यास बॅक्टेरिया दूर होतात. शरीर कमजोर होण्यापासून वाचते.

**घशाच्या इन्फेक्शनमध्ये लाभदायक :** हे मिश्रण घशातील संक्रमण दूर करते. यात ॲण्टी इन्फ्लेमेटरी गुण आहे. घशातील खरखर आणि सूज कमी करण्यास मदत करते.

# साखरेच्या ऐवजी मिठाई बनवताना वापरा खजुराची पेस्ट

**आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यामध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते.**

**रिफाइंड** साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे. आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेच्या ऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषतः अशी की, त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत.

शंभर ग्राम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेच्या ऐवजी वापरले जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे.



खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी. या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला आगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत. त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

# जिमला जाताय... तर लक्षात ठेवा

- ■ जिम सुरू करण्याआधी आणि जिमिंग झाल्यानंतर लगेच पाणी किंवा ज्यूस पिणे टाळा.
- ■ आपण किती कॅलरीज कमी करतोय किंवा घेतोय याचा हिशोब असू द्या.
- ■ वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी लहान-लहान लक्ष्य निर्धारित करा.
- ■ ट्रेनरचा सल्ला घेतल्याशिवाय दुसऱ्यांना पाहून कोणतीही नवीन मशीन ट्राय करू नका.
- ■ जिमसाठी योग्य तेच कपडे आणि जोडे निवडा.
- ■ जिममध्ये घाम पुसण्यासाठी नेहमी स्वच्छ नॅपकिन वापरा.
- ■ कोणतीही मशीन वापरण्यासाठी नीट प्रशिक्षण घ्या आणि क्षमतेहून अधिक वर्कआऊट टाळा.
- ■ एखाद्या व्यायामाने आपले अंग दुखत असेल किंवा स्नायू खेचले जात असतील तर लगेच तो व्यायाम बंद करा.
- ■ कोणत्याही कंपनीचे प्रोटीन शेक किंवा एनर्जी ड्रिंक सेवन करण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
- ■ जर आपल्याला एखादे संक्रमण किंवा रोग असेल तर आधीच त्याची माहिती जिम ट्रेनरला द्या.

# आहारातील 'हे' बदल करतील मदत

महिलांना अनेकदा मूड स्विंग्सचा सामना करावा लागतो. मूड स्विंग्स होण्याला मूड डिसऑर्डर असेही म्हटलं जातं. अनेकदा चिडचिड किंवा तणाव, लहान-सहान गोष्टींवर रडणं, ऑफिस किंवा घरातील गोष्टींचं टेन्शन घेणं पहायला गेलं तर ही लक्षण साधारण समजली जातात.

परंतु या लक्षणांनी जर गंभीर रूप धारण केलं तर मात्र पीडित व्यक्ती डिप्रेशनमध्ये जाण्याची शक्यता असते. महिलांना ही समस्या त्यांच्या शरीरात होणाऱ्या हार्मोनल चेंजेसमुळे होते. जर तुमच्यासोबचतही अशा गोष्टी होत असतील आणि त्यामुळे सतत तुमचा मूड चेंज होत असेल तर, तुम्हाला तुमच्या आहाराकडे विशेष लक्षं देण्याची गरज आहे.

काही दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या एका संशोधनातून असं सिद्ध झालं की, मूड स्विंग्स किंवा तणाव योग्य आहार न घेतल्यानेही होतो. अशातच डाएटमध्ये बदल करा आणि मूड स्विंग्सच्या समस्येपासून सुटका करा.

### ओमेगा ३ चा उत्तम स्त्रोत अंडी

अंड्यामध्ये मुबलक प्रमाणात ओमेगा-३ फॅटी ॲसिड, भरपूर प्रोटीन आणि व्हिटॅमिन्स असतात. तणाव किंवा डिप्रेशनने त्रस्त असणाऱ्या लोकांसाठी अंडी अत्यंत फायदेशीर ठरतात.

### मूडसाठी उत्तम ठरतो नारळ

मिडिअम चैन फॅटी ॲसिड नावाचं तत्व फक्त नारळामध्ये आढळून येतं. जे मेंदूचं आरोग्य राखण्यासोबतच मूडसाठीही फायदेशीर ठरतं. नर्वस सिस्टमसाठी उत्तम ठरतात केळी केळी म्हणजे, पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअमचा उत्तम स्त्रोत. नर्वस सिस्टिमसाठी केळी अत्यंत फायदेशीर ठरतात. यांमध्ये असलेले कार्बोहायड्रेट्स बराच वेळ मूड ठिक ठेवण्यासाठी फायदेशीर ठरतात.

### सेरोटोनिन नियंत्रणात ठेवतं अक्रोड

अक्रोडमध्ये ओमेगा-3 फॅटी ॲसिड, प्रोटीन आणि मॅग्नेशिअम मुबलक प्रमाणात असतं. अक्रोड मेंदूमधील सेरोटोनिनचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत करतात. यामुळे फक्त मूड चांगला होत नाही तर, तुम्हाला शांत झोप मिळण्यासाठीही मदत होते.

### तणाव कमी करतं लिंबू

व्हिटॅमिन सी चा उत्तम स्त्रोत असणारं लिंबू तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर ठरतं. याचसोबत जर तुम्ही लिंबाचा आहारात समावेश केला तर आरोग्याच्या आणि त्वचेच्या अनेक समस्या दूर करण्यासाठी मदत होते.

# 'ग्रीन टी'च्या अतिसेवनामुळे होऊ शकतात या समस्या

**मागील काही वर्षांत भारतात ग्रीन टीचे सेवन अधिक वाढले आहे. ग्रीन टी आरोग्यासाठी चांगले आहे, यात शंकाच नाही. ग्रीन टीमध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडेंट्स असतात. जे शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, कॉलेस्ट्रॉल कमी करते. ग्रीन टी जिंक, मॅग्नीज आणि व्हिटामीन ए, बी, सी ची मात्रादेखील असते. मात्र हे सर्व फायदे असले तरी ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे आरोग्याला देखील नुकसान पोहोचते.**



**तोंडात फोडी येणे :** ग्रीन टीमध्ये टॅनिंस तत्त्व असते. जास्त ग्रीन टी प्यायल्याले टॅनिंस त्वचा कोरडी पडणे, तोंड कोरडे पडणे, पोट दुखणे आणि तोंडात फोडी येणे यासारख्या समस्या होतात.

**ब्लड प्रेशर वाढते :** अधिक प्रमाणात ग्रीन टीचे सेवन केल्याने ब्लड प्रेशरचा देखील धोका निर्माण होतो. ग्रीन टीमध्ये कॅफिन अधिक मात्रेत असतात. याच्या अधिक सेवनाने हृदयावर दबाव पडतो व तुमचे ब्लड प्रेशर वाढते.

**अशक्तपणा होऊ शकतो :** ग्रीन टीमध्ये काही असे तत्त्व असतात, जे शरीरातील आयरनला (लोह) शोषून घेण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्ही ग्रीन टीचे अधिक सेवन करत असाल तर तुम्ही ज्या पदार्थांचे सेवन करता त्यातील आयरन शरीराला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत रेड ब्लड सेल्स कमी होतात आणि अशक्तपणा येऊ शकतो.

**मानसिक तणाव आणि चिंता वाढणे :** ग्रीन टी तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अति सेवनामुळे याचा उलट परिणाम होऊन मानसिक तणाव आणि चिंतादेखील वाढते.

# पाणीटंचाई टाळण्यासाठी नैसर्गिक जलस्त्रोतांचा आधार
## उन्हाळ्यात कुपनलिका व विहिरींच्या पाण्याच्या वापराचा निर्णय

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

यंदाच्या उन्हाळ्यात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी ठाणे महानगरपालिका प्रशासनाने नैसर्गिक जलस्रोतांचा प्रभावी वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील कुपनलिकांची दुरुस्ती व पडताळणी तसेच विहिरींच्या पाण्याचा पुनर्वापर करण्याची मोहीम हाती घेण्यात येणार असून त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे.

महापालिका हद्दीतील एकूण १,९६० कुपनलिकांची सखोल पडताळणी करण्यात येणार असून आवश्यक त्या कुपनलिकांची दुरुस्ती केली जाणार आहे. या कामासाठी सुमारे ७५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून १२ फेब्रुवारी रोजी निविदेला मंजुरी देण्यात आली आहे. स्थायी समिती गठित झाल्यानंतर प्रस्ताव त्यांच्या अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात येणार असून त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे.



उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी आणि पिण्याच्या पाण्याची बचत साधण्यासाठी नैसर्गिक जलस्रोतांचा जास्तीत जास्त वापर महापालिकेचा हा प्रयत्न असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या शहरात ९७७कुपनलिकांद्वारे नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे. यातील पाणी मुख्यतः वाहन धुणे व इतर घरगुती कामांसाठी वापरले जाते. तसेच ४०४ कुपनलिकांद्वारे सार्वजनिक शौचालये, २२४ कुपनलिकांद्वारे उद्याने आणि ३५५ कुपनलिकांद्वारे महापालिकेच्या विविध इमारतींना पाणीपुरवठा केला जातो. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी या पर्यायी स्रोतांचा याशिवाय शहरातील विहिरींच्या पाण्याचाही पुनर्वापर करण्यासाठी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. वापर अधिक प्रभावीपणे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कपडे धुणे, भांडी स्वच्छ करणे, शौचालये, बागकाम आदी कामांसाठी विहिरींचे पाणी वापरण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे पिण्याच्या पाण्याची बचत होण्यास मदत होणार आहे.

**विहिरींच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष**

ठाणे शहरात सध्या एकूण ५५५ विहिरी असून त्यापैकी ३५० विहिरी महापालिकेच्या मालकीच्या, तर २०५ विहिरी खासगी मालकीच्या आहेत. विहिरींची दुरुस्ती, स्वच्छता आणि गाळ काढण्यासाठी सुमारे १ कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. दरम्यान, काही खासगी विहिरी दूषित झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशा विहिरींच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. महापालिकेने यापूर्वी २५ विहिरींच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले होते. त्यापैकी १० विहिरींची दुरुस्ती पूर्ण झाली असून - उर्वरित १५ विहिरींची कामे लवकरच सुरू होणार आहेत.

# मुंबई, वसई-विरार आणि मिरा-भाईंदरमध्ये चालू असलेल्या ऑनलाईन सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

■भाईंदर। प्रतिनिधी,

एस्कॉर्ट सर्विसच्या नावाखाली ऑनलाईन सेक्स रॅकेट चालवणाऱ्या टोळीवर पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत एका महिला एजंटला अटक करण्यात आली असून, अन्य एक महिला एजंट सध्या फरार आहे. पोलिसांनी यात दोन पीडित मुलींची सुटका केली आहे.

मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण यांना मुंबईतील एका स्वयंसेवी संस्थेकडून खात्रीलायक माहिती मिळाली होती. नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एस्कॉर्ट सर्विसच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती समोर आली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, ही महिला दलाल ग्राहकांना मुलींचे फोटो पाठवून त्यांच्याकडून गुगल पेद्वारे ऑनलाईन पैसे घेत असे आणि त्यानंतर मुली पुरवत असे. पोलीस उप आयुक्त राहुल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाण्याच्या





पथकाने बोगस ग्राहक पाठवून सापळा रचला.

यावेळी पोलिसांनी छापा टाकून एका महिला दलालला ताब्यात घेतले आणि दोन पीडित मुलींची सुटका केली. अटक केलेली महिला आणि मुंबईतील मुख्य सूत्रधार महिला गेल्या एक वर्षापासून मुंबई, वसई-विरार आणि मिरा-भाईंदर परिसरात हे रॅकेट चालवत होत्या.

या टोळीने आतापर्यंत किती मुलींना या व्यवसायात ढकलले आहे आणि त्यांचे जाळे किती मोठे आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. अटक करण्यात आलेल्या आणि फरार आरोपी महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहितेचे विविध कलमा सह पीटा ॲक्ट कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुटका करण्यात आलेल्या दोन्ही मुलींना महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे.

# 'माझे बाळ परत द्या हो'
## हॉस्पिटलमधून डॉक्टरनेच बाळ दुसऱ्या महिलेला विकलं, खळबळजनक प्रकार उघड

■भंडारा। प्रतिनिधी,

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात खळबळ उडवणाऱ्या बाळविक्री प्रकरणात रोज नवे खुलासे होत आहेत. आता बाळाच्या जन्मदात्या आईने 'माझे बाळ परत द्या हो' अशी काकुळतीची विनंती केली आहे. त्यामुळे बाळविक्रीचा हा घाट जन्मदात्यांना अंधारात ठेवून तसेच त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेत घालण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, डिसेंबर महिन्यातही या डॉक्टरांकडून जिल्ह्यात एका बाळाची विक्री झाल्याचे तपासात उघड झाल्याची माहिती आहे. यामुळे स्थानिक न्यू बालाजी हॉस्पिटलचा संचालक डॉ. नितेश बाजपेयी याने केलेला प्रताप चांगलाच चर्चेत आला आहे.

रुग्णालयात उपचार आणि प्रसूतीसाठी दाखल झालेल्या गरीब कुटुंबांची फसवणूक करीत बाळाला विकण्याच्या प्रकरणात आता नवनवीन गोष्टी पुढे येत आहेत. तिरोडा तालुक्यातील सेजगाव (टोला) येथील गर्भवतीस सातव्या महिन्यातच



प्रसव वेदना सुरू झाल्या. त्यामुळे महिलेने तातडीने गोंदिया येथील गंगाबाई स्त्री रुग्णालय गाठले. सोनोग्राफीनंतर दुसऱ्या दिवशी तिला पुन्हा असह्य वेदना झाल्याने ती न्यू बालाजी रुग्णालयात आली. गुंतागुंत निर्माण झाल्याने डॉक्टरांनी तिला तातडीने दाखल करून घेत 'सिझेरियन करावे लागेल' असे सांगितले. १६ ऑक्टोबर रोजी या महिलेने एका चिमुकलीला जन्म दिला.

बाळ 'प्री-मॅच्युअर'(मुदतीपूर्वी जन्मलेले) असल्याने उपचारासाठी नवजात बाळाला बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयात अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले. या रुग्णालयात जवळपास १ महिना ५ दिवस तिच्यावर उपचार सुरू राहिले. मात्र, प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने पुन्हा २२ नोव्हेंबर २०२५पासून तिला रामनगर येथील न्यू बालाजी रुग्णालयात डॉ. नितेश बाजपेयी याच्या रुग्णालयात अतिदक्षता विभागात ठेवले. जवळपास साडेतीन महिने बाळावर या रुग्णालयात उपचार सुरू होते. यादरम्यान मातेला अंधारात ठेवून त्यांच्या गरिबी आणि हतबलतेचा फायदा घेत डॉक्टरने तिच्या चिमुकलीच्या विक्रीचा कट रचला.

दरम्यान, डॉक्टर बाजपेयी आणि साथीदारांनी मिळून पांढराबोडी येथील मालती वाघमारे या महिलेला बाळविक्री केल्याचं समोर आलं आहे.

### दुधातून झोपेच्या गोळ्या द्यायचे अन् मुलांचे नग्न फोटो पाठवून सौदा...
# मुलं पळवणाऱ्या टोळीचा 'असा' झाला पर्दाफाश

■मुंबई। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील चंदौली जिल्ह्यातून मुलांचं अपहरण करून त्यांना विकणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून ही टोळी दीनदयाळ उपाध्याय जंक्शनवर सक्रिय होती. जीआरपी आणि आरपीएफच्या संयुक्त कारवाईत या टोळीतील तीन पुरुष आणि एक महिला या चार सदस्यांना अटक करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून अपहरण करण्यात आलेला दोन वर्षांचा निष्पाप मुलगा सुरक्षितपणे ताब्यात घेतला असून त्याला त्याच्या आईच्या स्वाधीन केलं. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ही टोळी रेल्वे स्थानके आणि बस स्टँडसारख्या गर्दीच्या ठिकाणी फिरायची आणि संधी मिळताच मुलांचं अपहरण केलं जायचं. ही मुले बिहारमधील एका व्यक्तीला महागड्या किमतीत विकली जायची.

बुधवारी रात्री, बिहारमधील रोहतास जिल्ह्यातील एक महिला पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन कॉम्प्लेक्सच्या बाहेर तिच्या मुलांसह झोपली होती. पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास, तिच्या दोन वर्षांच्या मुलाचं अपहरण झालं. संबंधित महिला झोपेतून जागी झाल्यानंतर तिला आपलं मुल तिच्याजवळ दिसलं नाही आणि मुल हरवल्याचं कळताच तिने तातडीने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली.

पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाबाबत स्पष्ट केलं की ही टोळी संघटित पद्धतीने काम करत होती. मुलाचे अपहरण केल्यानंतर, त्यांचे नग्न फोटो पुढच्या टीम किंवा खरेदीदाराला पाठवले जायचे. तिथून त्यांचा होकार मिळाल्यानंतरच, मुलाला त्यांच्याकडे विकलं जायचं. याबाबत त्यांनी सांगितलं की ही टोळी फक्त मेल चाइल्ड्स म्हणजे मुलांना लक्ष्य करायची, याचाच अर्थ मुलींचं अपहरण केलं जात नव्हतं. नवजात बाळांना जास्त किंमत मिळायची, म्हणजेच मूल जितकं लहान असेल तितकी किंमत जास्त. आता पोलीस या टोळीच्या मास्टरमाइंडच्या शोधात असल्याचं सांगितलं जात आहे.

पोलिसांनी सुरक्षितपणे ताब्यात घेतलेल्या मुलाला त्याच्या आईकडे सोपवलं. सध्या, टोळीतील चारही आरोपींना अटक करून त्यांची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे. या संघटित गुन्ह्याच्या मुळाशी जाण्यासाठी जीआरपी आणि आरपीएफ पथके आता टोळीच्या नेटवर्कचा आणि त्याच्याशी संबंधित इतर व्यक्तींचा तपास करत आहेत.

**दुधाची बाटली आणि झोपेच्या गोळ्या जप्त...**

तक्रार मिळताच, जीआरपी आणि आरपीएफ पथके सक्रिय झाली. त्यांनी स्टेशन परिसर आणि आजूबाजूच्या परिसरात शोध सुरू केला. संशयास्पद हालचालींच्या आधारे, पोलिसांनी चार जणांना अटक केली आणि अपहरण केलेलं मूल जप्त करण्यात आलं. अटक केलेल्या आरोपींची झडती घेतल्यानंतर, पोलिसांना मुलांचे नवे कपडे, दुधाची बाटली आणि झोपेच्या गोळ्या सुद्धा मिळाल्या. चौकशीदरम्यान आरोपींनी सांगितलं की, ते मुलांना दुधातून झोपेच्या गोळ्या देऊन त्यांना बेशुद्ध करायचे, जेणेकरून मुलाचं अपहरण करताना त्याचा कोणताही आवाज येणार नाही.

# उल्हासनगरात व्याजाच्या पैशांवरून अमानुष कृत्य अन् धमकी

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

उल्हासनगरमध्ये माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका तरुणाने व्याजाने पैसे घेतले होते, ते पैसे परत देण्यास त्याला विलंब झाल्याच्या कारणावरून आरोपीने संबंधित तरुणाला मारहाण केली. पीडित तरुणाला लॉजवर नेले आणि त्याला नग्न करून अश्लील व्हिडिओ बनवला. तो तरुण एवढ्यावरच न थांबता त्याने 'लिंग छाटून टाकेन' अशी देखील धमकी दिली. जर 'तुला पैसे देणं होत नसेल तर तुज्या बहिणीला आमच्याकडे पाठवून दे,' असं अमानुष वक्तव्य केलं.



या प्रकरणात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार चिराग मीरचंदानी (वय ३०) हे अंबरनाथ पूर्व येथील आश्रय आनंद इमारतीत कुटुंबासह राहतात. त्यांनी आरोपी अमित चागुला याच्याकडून ४ लाख रुपये व्याजाने घेतले होते. त्यापैकी २ लाख ५० हजार रुपये त्यांनी परत देखील केले होते. वाढत्या व्याजामुळे उर्वरित रक्कम देण्यास विलंब लागेल असं सांगितल्याने आरोपींनी हा कट रचला.

**'व्याजाचे पैसे न दिल्यास गुप्तांग छाटील, तुझ्या बहिणीला...' अमानुष कृत्य**

९ फेब्रुवारी रोजी उल्हासनगरातील एका चायनिज सेंटरवर जेवण करताना आरोपींनी लोखंडी पाईपने चिरागला बेदम मारहाण केली. नंतर जबरदस्तीने कारमध्ये बोलावून बदलापूर येथील एका कार्यलयात नेऊन पुन्हा मारहाण करत व्हिडिओ तयार करण्यात आले. पैसे न दिल्यास त्याचे गुप्तांग छाटण्याची धमकी देखील दिली. त्याच्या बहिणीबाबत अश्लील आणि अवमानकारक वक्तव्य करत पैशांची मागणी केली.

**आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल**

अखेरीस आरोपीच्या सांगण्यावरून कैलाशनगर परिसरातील एका व्यक्तीकडून १ लाख २५ हजार रुपये जमा केल्यानंतर चिरागची सुटका करण्यात आली. या प्रकरणात हिल लाईन पोलीस ठाण्यात अमित चागुला, कमला नागदेव आणि त्यांच्या दोन अन्य साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी सध्या फरार आहेत.

# मॅडम 'तो' तुम्हाला 'लॉलीपॉप' म्हणाला, विद्यार्थीनीने सांगताच गैरसमज झाला

■गोंदिया। प्रतिनिधी,

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील गोरठा येथील आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एका गैरसमजातून शिक्षकेने ९ वर्षीय विद्याथ्यार्ला बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे गावात संतापाची लाट उसळली असून विद्यार्थ्याच्या आईने आमगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.





**गैरसमज झाल्याने घडला प्रकार**

अधिकची माहिती अशी की, धैर्य मनोज मिश्रा (वय ९) हा दुपारच्या सुट्टीदरम्यान वॉशरूमकडे जात असताना त्याच्या मित्राकडे असलेल्या लॉलीपॉपबाबत बोलत होता. गोंदियातील ग्रामीण भागात लॉलीपॉपला ह्यचूपरीह्ण असे संबोधले जाते. धैर्यने आपल्या मित्राला "माझी चूपरी मला दे" असे म्हटल्याचे सांगितले जाते. मात्र हे शब्द जवळ उभ्या असलेल्या एका विद्यार्थिनीने ऐकले आणि तिला धैर्यने शिक्षिका शोभा गिरडकर यांना 'चूपरी' म्हटल्याचा गैरसमज झाला. त्या विद्यार्थिनीने ही बाब संबंधित शिक्षिकेला सांगितल्यानंतर शिक्षिकेने धैर्यला बोलावून घेतले आणि त्याला बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. मारहाणीमुळे धैर्य घाबरून गेला असून शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. शाळेतून घरी आल्यानंतर धैर्यने झालेल्या प्रकाराची माहिती आपल्या पालकांना दिली.

**पोलीस ठाण्यात शिक्षिकेविरुद्ध गुन्हा दाखल**

सायंकाळी धैर्यची आई राणी मिश्रा घरी आल्यानंतर मोठ्या मुलांनी धैर्यला झालेल्या मारहाणीबाबत सांगितले. आपल्या मुलाला बेशुद्ध होईपर्यंत मारहाण करण्यात आल्याचा आरोप करत त्या संतप्त झाल्या. दुसऱ्याच दिवशी त्यांनी आमगाव पोलीस स्टेशन गाठून संबंधित शिक्षिकेविरुद्ध तक्रार दाखल केली. या घटनेनंतर धैर्यचे मनोबल खचले असून तो शाळेत जाण्यास घाबरत असल्याचे आईने सांगितले. "माझ्या मुलाने काही चुकीचे बोलले नव्हते. गैरसमजातून त्याला मारहाण करण्यात आली," असा आरोप त्यांनी केला आहे. राईट टू एज्युकेशन कायद्यानुसार विद्यार्थ्यांवर शारीरिक शिक्षा करण्यास बंदी आहे. त्यामुळे पोलीस तक्रारीनंतर शिक्षण विभागाकडून संबंधित शिक्षिकेवर कोणती कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आधी प्रेयसीवर झाडल्या गोळ्या, मग स्वत:वर... मृत्यूशी झुंज संपली, रक्ताळलेल्या प्रेमकांडाचा भीषण शेवट!

■मुंबई । प्रतिनिधी,

पंजाबच्या तरनारन येथील लॉ कॉलेजच्या क्लासमध्ये एका विद्यार्थ्याने त्याच्या वर्गातील मुलीवर गोळी झाडून तिची हत्या केली आणि नंतर स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक बातमी समोर आली होती. संबंधित घटना ही सोमवारी (९ फेब्रुवारी) घडली असून या भयानक घटनेने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये भितीचं वातावरण निर्माण झालं.

संबंधित घटनेच्या सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आलेल्या माहितीनुसार, क्लास सुरू होण्यापूर्वी पीडिता संदीप आणि आरोपी प्रिन्स यांच्यात वाद झाला. हा वाद टोकाला पोहोचताच, अचानक प्रिन्सने त्याच्याजवळ असलेली पिस्तूल बाहेर काढली आणि थेट संदीपवर गोळी झाडली. गोळी लागल्यानंतर, ती जमिनीवर कोसळली आणि प्रिन्सने लगेच पिस्तून पुन्हा लोड करून स्वत:वर गोळी झाडली. यामध्ये, दोघांचा जागीच मृत्यू झाला. गोळी लागल्यानंतर आरोपी २० वर्षीय प्रिन्स राज याला गंभीर अवस्थेत अमृतसरमधील गुरु नानक देव रुग्णालयात दाखल करण्यात आलं.



मात्र, बुधवारी रात्रीच्या सुमारास त्याचा मृत्यू झाल्याची बातमी पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, संदीप कौरच्या कुटुंबियांनी केलेल्या दाव्यानुसार, प्रिन्स काही काळापासून तिला त्रास देत होता आणि तो एकदा तिचा पाठलाग करत तिच्या घरीही गेला होता. कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या मुलीचं लग्न ठरलं होतं आणि लवकरच तिचं लग्न होणार होतं. परंतु, आरोपी तिचा छळ करायचा आणि त्यामुळेच ही भयानक घटना घडली. आता, नातेवाईकांनी आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केल्याचं सांगितलं जात आहे.

घटनेत ज्या पिस्तूलचा वापर करण्यात आला, ती अवैध असल्याचं पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आलं. शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गतही या प्रकरणासंबंधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता, आरोपी विद्यार्थ्याकडे ती पिस्तूल कुठून आली? याचा पोलीस तपास करत आहेत. प्रिन्स राज हा मल्लिया गावाचा रहिवासी होता. तसेच, संदीप कौर नौशेरा पन्नुआं गावाची रहिवासी होती. दोघेही एकाच कॉलेजमध्ये 'लॉ'चे प्रथम वर्षाचे विद्यार्थी होते. एकत्र शिकणाऱ्या दोन तरुणांचे आयुष्य अशा प्रकारे संपेल याची कल्पनाही कोणी केली नव्हती.

वर्गातील ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. फुटेजमध्ये आरोपी प्रिन्स राज, संदीप कौर आणि पीडितेची मैत्रीण एकत्र बसलेले दिसले. इतर विद्यार्थीही जवळपास उपस्थित होते. अचानक, दोघांचा एकमेकांसोबत वाद सुरू असताना प्रिन्स त्याच्या जागेवरून उठला, त्याने त्याच्या बॅगेतून पिस्तूल काढले आणि एकही शब्द न बोलता संदीप कौरच्या डोक्यावर ती रोखून गोळी झाडली. त्यानंतर, क्षणाचाही विलंब न करता आरोपीने स्वत:वर सुद्धा गोळी झाडली. त्यावेळी, वगार्तील विद्यार्थ्यांमध्ये भितीचं वातावरण निर्माण झालं होतं. तातडीने कॉलेज प्रशासन आणि पोलिसांना याची माहिती देण्यात आली.

# १५ वर्षीय विद्यार्थीनीवर व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तिघांकडून अत्याचार

■नागपूर । प्रतिनिधी,

पीडित मुलगी जेव्हा आरोपीच्या घरी पोहोचली, तेव्हा तिथे आरोपी आणि त्याचे दोन मित्र आधीच उपस्थित होते. मुख्य आरोपीने मुलीला एका खोलीत नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. धक्कादायक बाब म्हणजे, हे कृत्य घडत असताना बाहेर असलेल्या त्याच्या दोन मित्रांनी या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ मोबाईलमध्ये कैद केला. यानंतर, हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत इतर दोन आरोपींनीही पीडितेवर अत्याचार केला.

नागपूर मधील नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इयत्ता नववीच्या वर्गात शिकणाऱ्या एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच मैत्रिणीच्या भावाने आणि त्याच्या दोन मित्रांनी सामूहिक अत्याचार आहे. मुख्य आरोपी हा पिडित विद्यार्थीच्या मैत्रिणीचा भाऊ आहे. तो बारावीत शिक्षण घेत आहे. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून, त्यापैकी दोन आरोपी हे अल्पवयीन आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य आरोपी हा स्वतः अल्पवयीन असून तो बारावीचा विद्यार्थी आहे. पीडित मुलगी ही मुख्य आरोपीच्या बहिणीच्या वर्गात शिकत असल्याने दोघी चांगल्या मैत्रीणी होत्या. त्यामुळे दोघींच्या एकमेकींच्या घरी अभ्यासाच्या निमित्ताने ये जा होत होती. याच ओळखीचा फायदा घेत आरोपीने तिला अनेकदा भेटण्यासाठी बोलावले होते. मात्र, पीडितेने त्याला वारंवार नकार दिला. असे असतानाही आरोपीने तिला मेसेज करणे सुरूच ठेवले. अखेर ४ फेब्रुवारी रोजी आरोपीने पीडितेशी संवाद साधून तिला आपल्या घरी बोलावले.

पीडित मुलगी जेव्हा आरोपीच्या घरी पोहोचली, तेव्हा तिथे आरोपी आणि त्याचे दोन मित्र आधीच उपस्थित होते. मुख्य आरोपीने मुलीला एका खोलीत नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. धक्कादायक बाब म्हणजे, हे कृत्य घडत असताना बाहेर असलेल्या त्याच्या दोन मित्रांनी या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ मोबाईलमध्ये कैद केला. यानंतर, हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत इतर दोन आरोपींनीही पीडितेवर अत्याचार केला.

या घटनेनंतर आरोपींनी पुन्हा एकदा पीडितेला तो व्हिडिओ दाखवून ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला आणि तिला पुन्हा भेटायला बोलावले. मात्र, या जाचाला कंटाळून आणि प्रचंड घाबरलेल्या अवस्थेत असलेल्या पीडितेने अखेर धाडस दाखवून आपल्या कुटुंबाला आपबिती सांगितली. त्यानंतर नंदनवन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्यावर पोक्सो कायद्यांतर्गत आणि बलात्काराचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



# ६ वर्षांच्या चिमुरडीवर वर्षभर लैंगिक अत्याचार
## वडिलांसोबत घरात सापडला मृतदेह; पोस्ट-मार्टम रिपोर्टमध्ये धक्कादायक खुलासा

काही दिवसांपूर्वी एका भाड्याच्या घरात वडील आणि सहा वर्षांच्या मुलीचा मृतदेह आढळला होता. आधी मुलीला विष देऊन तिला संपवले अन् वडिलांनी आत्महत्या केली. यामुळे सर्वजण हळहळ व्यक्त करत होते. मात्र पोस्ट मार्टम रिपोर्टनंतर सर्वांच्याच पायाखालची जमीन सरकली आहे. मृत्यूपूर्वी सहा वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार करण्यात आला होता. धक्कादायक म्हणजे गेल्या एक वषार्पासून चिमुरडीवर लैंगिक अत्याचार सुरु होते. केरळच्या कोचीमधील ही घटना आहे.

**कुटुंबात काय सुरु होतं?**

कोची येथील एलमक्कारा परिसरात 16 जानेवारी रोजी ही हृदयद्रावक घटना घडली होती. वडिलांनी आधी आपल्या सहा वर्षांच्या मुलीला विष दिले आणि त्यानंतर स्वतः भाड्याच्या घरात आत्महत्या केली. सुरुवातीला पोलिसांनी या प्रकरणाची नोंद 'आकस्मिक मृत्यू' अशी केली होती. मात्र, आता समोर आलेल्या वैद्यकीय पुराव्यांमुळे या घटनेमागील काळेबेरे उघड झाले असून, कुटुंबात नेमकं काय सुरु होतं, याबाबत मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

**'अत्याचाराविषयी काहीच कल्पना नाही'**

मुलीच्या आईने पोलिस चौकशी दरम्यान सांगितले की, कुटुंबाला अशा कोणत्याही अत्याचाराची पुसटशी कल्पना नव्हती. घटनेच्या दिवशी पैशांच्या वादावरुन पती-पत्नीमध्ये भांडण झाले होते. त्यानंतर ही टोकाची घटना घडली. आता लैंगिक अत्याचाराची बाब समोर आल्यानंतर पोलिसांनी या गुन्ह्यात 'पॉक्सो' कायद्यांतर्गत कलमे वाढवली असून, त्या नराधमाचा शोध घेण्यासाठी तपास अधिक तीव्र केला आहे.

**पोलिस शिक्षकांशी संवाद साधणार**

तपासाचा एक भाग म्हणून पोलीस आता मुलीच्या शाळेतील शिक्षकांशी संवाद साधणार आहेत, जेणेकरून तिच्या वागण्यातील बदलांबाबत काही माहिती मिळू शकेल. तसेच, घटनेच्या दिवशी घरामध्ये कोणी तिसरी व्यक्ती आली होती का, याचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. पोलीस लवकरच नातेवाईक आणि जवळच्या व्यक्तींचे जबाब नोंदवणार असून, या चिमुकलीच्या आयुष्याशी खेळणारा खरा गुन्हेगार कोण आहे, याचा शोध घेण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com